

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार "
– शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर संचलित

# आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर

ता. कडेगांव, जि. सांगली.

आजादी का
अमृत महोत्सव

केशरी रंगातून सूर्याच्या
भाव जागतो धैर्य अन् त्यागाचा
पांढऱ्या रंगातून घुमतो
आवाज सत्य अन् शांतीचा
हिरवा रंग समृद्धीचा
भूमीपुत्र बळीराजाच्या कष्टाचा
गतिमान निळ्या अशोक चक्रातून
संदेश मिळतो प्रगतीचा
स्वातंत्र्य, समता, बंधुतेच्या
रंगूनी तिरंग्यात आपुल्या
साजरा करितो भारत
अमृत महोत्सव स्वातंत्र्याचा

# डोंगराई

२०२१-२२

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर

ता. कडेगांव, जि. सांगली.

# डोंगराई

## २०२१-२०२२

❖ अध्यक्ष ❖
प्रभारी प्राचार्य बापूराव पवार

❖ संपादक ❖
प्रा.डॉ.विजया पवार

❖ जाहिरात विभाग
प्रा.दत्तात्रय होनमाने व सदस्य

❖ अहवाल विभाग
प्रा.डॉ.जयदिप दिक्षित

❖ विभागीय संपादक
प्रा.कुमार इंगळे (मराठी)
प्रा.सूरज डुरे (हिंदी)
प्रा.शिवराज उथळे (इंग्रजी)

❖ मुखपृष्ठ संकल्पना - प्रा.डॉ.विजया पवार

❖ मुद्रक - साईनाथ प्रेस, कराड.

# डोंगराई

## २०२१-२०२२

## प्रकटन

भारत सरकारच्या १९५६ प्रेस ॲक्ट रजिस्ट्रेशन ऑफ बुक्सच्या कायद्यातील ८ नं. ४ अन्वये आवश्यक ती माहिती –


- **प्रकाशन स्थळ** – आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर ता. कडेगांव, जि. सांगली.
- **प्रकाशन काळ** – वार्षिक
- **प्रकाशकाचे नाव** – श्री. बापूराव पवार
- **राष्ट्रीयत्व** – भारतीय
- **पत्ता** – आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर ता. कडेगांव, जि. सांगली.
- **संपादक** – प्रा. डॉ. विजया पवार
- **राष्ट्रीयत्व** – भारतीय
- **पत्ता** – आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर ता. कडेगांव, जि. सांगली.
- **मुद्रकाचे नांव** – श्री. विजय साळवे
- **राष्ट्रीयत्व** – भारतीय
- **पत्ता** – साईनाथ प्रिंटिंग प्रेस, कराड. ता. कराड, जि. सातारा.


**अंतरंग**


प्राचार्यांचे मनोगत
संपादकिय
साहित्य विभाग
वरिष्ठ विभाग
मराठी
हिंदी
इंग्रजी
विविध उपक्रमाची क्षणचित्रे
कलाविष्कार
अहवाल विभाग


मी प्राचार्य श्री.बापूराव पवार 'डोंगराई' या नियतकालिकाचा प्रकाशक या नात्याने जाहिर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहे.

**स्थळ :** कडेपूर

**दिनांक :** २९/०६ /२०२२

**प्र.प्राचार्य श्री. बापूराव पवार**


या नियतकालातील कविता, लेख, कथा व इतर साहित्य व मत प्रवाहाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. अंकातील साहित्य कृतीच्या स्वतंत्रतेची व अन्य जबाबदारी संबंधित लेखक व लेखिकांची आहे. या अंकांतील मतांशी प्रकाशक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

(फक्त खाजगी वितरणाकरिता)

संपादक

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर

ता. कडेगांव, जि. सांगली.

## * संस्थेची प्रार्थना *

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।

राम, कृष्ण, रहीम, ख्रिस्त, बुध्द, झरतुष्ट्र ।
महावीर मानवसंत मानव्याचे दीपस्तंभ
लीन दीन होऊन त्यांचे
वंदुया चरण ।

सत्य, शील, प्रामाणिकता
त्याग, पिळवणुकीस आळा
मानव्याचे अधिष्ठान
ईशतत्व दर्शन ।

यांचे ज्ञान नि विज्ञान हाच सुसंस्कार ।
विवेकाच्या आनंदाचा लाभ शिक्षणांत ।

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

अग्ने नय सुपथा राये अस्मान् ।
विश्वानिदेव वयुनानि विद्वान ।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो
भूयिष्ठां ते नम उक्तिम् विधेम् ।

- ईशावास्योपनिषद्

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार''
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर

ता. कडेगांव, जि. सांगली.

## * ध्येयधोरण *

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'
सत्य, शील, प्रामाणिकपणा, चारित्र्य, पिळवणूक प्रवृत्तीस आळा, सेवा आणि त्याग या मौलिक निष्ठा जीवनात उतरविण्याचा प्रयत्न करणे हा सुसंस्कारी शिक्षणाचा हेतू राहील.
आचार, विचार आणि उच्चार यांच्या पावित्र्यावर आग्रहपूर्वक भर देणे.

## * संस्थेची उद्दिष्टे *

- संस्थेच्या शाळा व उपशाखांतून जात, धर्म, पंथ अथवा वर्ण भेदाभेद मानला जाणार नाही.
- संस्था राजकारणापासून अलिप्त राहिल.
- जीवनात हरघडी साधेपणा व काटकसर यांची जपवणूक संस्था करील.
- संस्थेच्या शाखांचे विशेष सर्वांना पाहण्यास खुले व उपलब्ध राहतील.
- सामान्य समाजाच्या सुसंस्कारी विकासाच्या ध्येयासाठी उत्स्फूर्तपणे वाहून घेणारे आदर्श समाजसेवक निर्माण करणे.
- प्राचीन काळातील गुरुपरंपरेला धरून शिक्षक कार्यकर्त्यांच्या आदर्श जीवनाच्या धड्यातून नवीन शिक्षण पध्दती निर्माण केली जाईल. जिच्यामुळे आत्मसमर्पण, प्रामाणिकपणा, सत्य, समता, बंधुता या वृत्तीचा परिपोष केला जाईल. स्वतंत्र विचारवृत्ती आणि नवनिर्मिती यांची कुवत विकसित करणे. संस्थेचे देणे असल्यास आपण सार्वजनिक पैशाचा दुरुपयोग करतो याबद्दल कबुली जबाब देणे.

।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ।।



शिक्षण महर्षी **डॉ. बापूजी साळुंखे**

संकल्पक संस्थापक 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था', कोल्हापूर

जन्म - ९ जून १९१९

महानिर्वाण - ८ ऑगस्ट १९८७

# संस्था पदाधिकारी

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर



अध्यक्ष,

**मा.नामदार चंद्रकांत (दादा) पाटील**

महसूल, मदत आणि पुनर्वसन,
सामाजिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य



कार्याध्यक्ष,

**मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
कोल्हापूर.

# संस्था पदाधिकारी

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर



मा.प्राचार्या सौ.शुभांगी गावडे
सेक्रेटरी



मा.जगन्नाथ आवटे (वकील)
कार्याध्यक्ष



मा. नामदेवराव कांबळे
उपाध्यक्ष



मा. लालासाहेब यादव
उपाध्यक्ष



मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ
सहसचिव (प्रशासन)



मा. सिताराम गवळी
सहसचिव (अर्थ)

# संस्था पदाधिकारी

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर



मा.डॉ.डी.टी.शिर्के
प्र.कुलगुरु
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर



माजी प्राचार्य डॉ.उदयसिंह माने-पाटील
(सेवानिवृत्ती - ३१ जानेवारी २०२२)

।। महाविद्यालयाचे नेतृत्व ।।




मा.प्र.प्राचार्य श्री. बापूराव पवार

# अभिनंदनीय - प्राध्यापक व खेळाडू


प्रा.डी.ए.पवार
राजर्षी शाहू महाराज गौरव पुरस्कार २०२२


प्रा.सौ.एस.एन.चव्हाण
विभागीय वक्तृत्व स्पर्धा प्रथम क्रमांक


करण जाधव
(बी.ए.भाग १) विद्यापीठ जिल्हास्तर कुस्ती स्पर्धा


शुभम पवार
(बी.ए.भाग १) विद्यापीठ जिल्हास्तर कुस्ती स्पर्धा


वसीम इनामदार
(बी.ए.भाग १) विद्यापीठ विभागीय ज्युदो स्पर्धा


शुभम कुंभार
(बी.ए.भाग १) N.S.S. जावळी कॅंप सहभाग


महेश कदम
(बी.ए.भाग १) N.S.S. जावळी कॅंप सहभाग


स्वप्नील झरेकर
(बी.ए.भाग १) N.S.S. जावळी कॅंप सहभाग


कु.मेघना भंडारे
(बी.ए.भाग २) N.S.S.शिबीर पाचगणी


संकेत कणसे
(बी.ए.भाग २) N.S.S.शिबीर पाचगणी

# महाविद्यालयातील गुरुदेव कार्यकर्ते


महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्रा.बापूराव पवार यांचेसमवेत प्राध्यापक वृंद


महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्रा.बापूराव पवार यांचेसमवेत मुख्य संपादक प्रा.डॉ.विजया पवार, प्रा.कुमार इंगळे, प्रा.सुरज डुरे-पाटील, प्रा. शिवराज उथळे


महाविद्यालयातील वरिष्ठ लिपिक श्री. एस. ए. लोखंडे, श्री.एस.जी.माने, श्री.डी.एस.भोंगाळे, श्री.महेश तुरेवाले

# वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ



महाविद्यालयातील वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी प्रतिमा पूजन करताना मा.प्रा.आर.बी.पाटील व प्र.प्राचार्य डॉ.महेश गायकवाड




प्रास्ताविक करताना मा.प्र.प्राचार्य बापूराव पवार,प्रा.अनिता व्हटकर, मा.प्रा.आर.बी.पाटील, प्र.प्राचार्य डॉ.महेश गायकवाड



अहवाल वाचन करताना प्रा.शीला इंगवले, प्र.प्राचार्य बी.बी.पवार प्रा.आर.बी.पाटील, प्र.प्राचार्य कॅप्टन डॉ.महेश गायकवाड



वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमामध्ये कथाकथन करताना प्रा.आर.बी.पाटील समोर उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी



वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र.प्राचार्य कॅ.डॉ.महेश गायकवाड मनोगत व्यक्त करताना



वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमामध्ये मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना विद्यार्थीनी कु.मेघना भंडारे



वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमामध्ये मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना विद्यार्थी अक्षय फुके



वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमासाठी उपस्थित प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी

# सांस्कृतिक विभाग क्षणचित्रे



महापरिनिर्वाण दिन प्रसंगी बोलताना प्रा.अजित पवार व सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. शीला इंगवले, प्रा.संगीता पाटील



बालिकादिना निमित्त व्याख्यान देताना प्रा. स्वाती चव्हाण, प्र.प्राचार्य बापूराव पवार, प्रा.गुलाब बागवान, प्रा.सौ. हावळे



संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या पुण्यस्मृती दिनानिमित्त अभिवादन करताना माजी विद्यार्थीनी उषा शिंदे व प्राध्यापक




शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिना निमित्त अभिवादन करताना प्राचार्य व प्राध्यापक



पारंपारिक वेशभूषा दिनानिमित्त कलाकृती सादर करताना विद्यार्थीनी कु. मानसी करकटे व प्राध्यापक वृंद




महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना प्र.प्राचार्य बी.बी.पवार व प्रा. डी.ए.होनमाने व इतर



पारंपारिक वेशभूषा दिन सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक वृंद



फनी गेम्स् मध्ये सहभागी विद्यार्थी

# महाविद्यालयातील व्याख्याने



Soft Skils या विषयावर व्याख्यान देताना प्र.प्राचार्य डॉ.सतीश घाडगे प्र.प्राचार्य श्री.बापूराव पवार, प्रा.दळवी, प्रा.उथळे, प्रा.सौ.माने-देशमुख




E-Commerce after covid-19 या विषयावर व्याख्यान देताना प्रा.डॉ.भरत पाटील,प्रा.अरुणा पोटे,प्रा.आशा सावंत.



राजर्षी छ.शाहू महाराज यांच्याविषयी बोलताना प्रा.जोतीराम आंबवडे, प्र.प्राचार्य बापूराव पवार व प्रा.डॉ.महानवर, प्रा.इंगवले



'स्वाधीनता संग्राम में हिंदी साहित्यकारों का योगदान' या विषयांवर बोलतांना प्रा.मच्छिंद्र कुंभार,सौ.आशा हावळे, प्रा.सुरज डुरे



मराठी विभागामार्फत शौर्यगीते सादर करताना ज्येष्ठ कवी मा.श्री.सदानंद माळी, प्र.प्राचार्य श्री.बापूराव पवार



शिवस्वराज्य दिनानिमित्त मार्गदर्शन करताना मा.प्रा.अविनाश यादव प्र.प्राचार्य बापूराव पवार व प्रा.डॉ.महानवर, प्रा.इंगवले




मराठी विभागातर्फे 'स्वातंत्र्य संग्रामातील साहित्यिकांचे योगदान' याविषयी बोलतांना प्रा.डॉ. तातोबा बदामे



प्राध्यापक प्रबोधिनी मध्ये व्याख्यान देताना प्रा.डी.ए.पवार, प्र.प्राचार्य श्री.बापूराव पवार,प्रा.अरुणा पोटे, डॉ.सुरज कचरे

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार''
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

# आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर

## व्यवस्थापन मंडळ २०१५-२०१८

| | | |
|---|---|---|
| १. | मा.आमदार चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील | अध्यक्ष |
| २. | मा. नामदेवराव विठ्ठलराव कांबळे | उपाध्यक्ष |
| ३. | मा. लालासाहेब भानुदास जाधव | उपाध्यक्ष |
| ४. | मा. प्राचार्य अभयकुमार गोविंदराव साळुंखे | कार्याध्यक्ष |
| ५. | मा. जगन्नाथ रंगनाथ आवटे (वकील) | कार्याध्यक्ष |
| ६. | मा. प्राचार्या सौ. शुभांगी मुरलीधर गावडे | सेक्रेटरी |
| ७. | मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र विश्वनाथ शेजवळ | सहसचिव प्रशासन |
| ८. | मा. सिताराम महारू गवळी | सहसचिव अर्थ |
| ९. | मा. खासदार संभाजी शाहू छत्रपती | सदस्य |
| १०. | मा. अविनाश दिनकर पाटील | सदस्य |
| ११. | मा. जगन्नाथ गदू वायदंडे | सदस्य |
| १२. | मा. सदाशिव कृष्णा कुंभार | सदस्य |
| १३. | मा. भाऊसाहेब नानासाहेब सांगळे | सदस्य |
| १४. | मा. विष्णू सुबराव पाटील | सदस्य |
| १५. | मा. शशिकांत यशवंत काटे | सदस्य |
| १६. | मा. प्राचार्य डॉ. जयसिंग श्रीराम देशमुख | सदस्य |
| १७. | मा. श्रीराम शरदचंद्र साळुंखे | सदस्य |
| १८. | मा. प्राचार्य डॉ. रमेश राजाराम कुंभार | सदस्य |
| १९. | मा. डॉ. महेश नारायणराव गायकवाड | सदस्य |
| २०. | मा. नारायण शंकर पुरी | सदस्य |
| २१. | मा. गुलाबराव जगन्नाथ बोराटे | सदस्य |

## विश्वस्त मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. | मा. प्राचार्य अभयकुमार गोविंदराव साळुंखे | अध्यक्ष |
| २. | मा. प्राचार्या सौ. शुभांगी मुरलीधर गावडे | अध्यक्ष |
| ३ | मा. सिताराम महारू गवळी | सहसचिव अर्थ |

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार''
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

# आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर

## महाविद्यालय विकास समिती

| | |
|---|---|
| १. मा. प्राचार्य अभयकुमार गोविंदराव साळुंखे | अध्यक्ष |
| २. मा. प्राचार्या सौ. शुभांगी मुरलीधर गावडे | सचिव व्यवस्थापन मंडळ |
| ३. डॉ. आर. पी. महानवर | सदस्य (प्राचार्य नियुक्त) |
| ४. प्रा. सौ. ए. ए. हावळे | सदस्य (प्राध्यापक प्रतिनिधी) |
| ५. प्रा. डी. ए. होनमाने | सदस्य (प्राध्यापक प्रतिनिधी) |
| ६. प्रा. श्रीमती एस्.वाय. पाटील | सदस्या (प्राध्यापक प्रतिनिधी) |
| ७. श्री. आर. डी. पवार | सदस्य (शिक्षकेत्तर कर्मचारी) |
| ८. मा. रिक्त | (सदस्य संशोधन क्षेत्र) |
| ९. मा. पृथ्वीराज देशमुख ( बाबा ) | सदस्य (शिक्षण क्षेत्र) |
| १०. मा. संग्रामसिंह देशमुख ( भाऊ ) | सदस्य (औद्योगिक क्षेत्र) |
| ११. प्रा. जी. आर. बागवान (२८/१/२०२२ पर्यंत) | सदस्य (समन्वय IQAC) |
| १२. प्रा. डी. ए. पवार (२९/१/२०२२ नंतर) | सदस्य (समन्वय IQAC) |
| १३. प्राचार्य डॉ. उदयसिंह माने-पाटील (३१/१/२०२२ पर्यंत) | पदसिध्द सचिव |
| १४. प्राचार्य बी. बी. बापूराव पवार (१/२/२०२२ नंतर) | पदसिध्द सचिव |

## आजीव सेवक मंडळ

| | |
|---|---|
| १. मा. सीताराम महारू गवळी | अध्यक्ष |
| २. मा. प्राचार्या सौ.शुभांगी मुरलीधर गावडे | सेक्रेटरी |
| ३. मा. प्राचार्य डॉ.राजेद्र विश्वनाथ शेजवळ | सदस्य |
| ४. मा. भाऊसाहेब नानासाहेब सांगळे | सदस्य |
| ५. मा. विष्णू सुबराव पाटील | सदस्य |
| ६. मा. शशिकांत यशवंत काटे | सदस्य |
| ७. मा. डॉ. जयसिंग श्रीराम देशमुख | सदस्य |
| ८. मा. श्रीराम शरदचंद्र साळुंखे | सदस्य |

# प्राचार्यांचे मनोगत



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक, संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे. बापूजींच्या कार्यातच आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे आणि विश्व बंधुत्वाची शिकवण देणारे श्री. स्वामी विवेकानंद यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करून आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूरचा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा डोंगराई वार्षिक अंक आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. दिनांक १ फेब्रुवारी २०२२ पासून मला या महाविद्यालयाचा प्रभारी प्राचार्य म्हणून काम करण्याची संधी दिली त्याबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे, संस्थेच्या सचिवा मा. प्राचार्या शुभांगी गावडे मॅडम, संस्थेचे उपाध्यक्ष मा. लालासाहेब यादव (आबा), संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. कौस्तुभजी गावडे तसेच सर्व पदाधिकारी यांच्या ऋणात राहू इच्छितो.

शैक्षणिक २०२१-२०२२ हे सर्व कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे प्रभावित झालेले होते. अशा परिस्थितीत महाविद्यालयातील माझ्या सर्व सहकाऱ्यांनी अतिशय प्रामाणिकपणे व प्रयत्नपूर्वक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग, स्पर्धा परीक्षा विभाग, महिला सक्षमीकरण विभाग, सहल विभाग, प्राध्यापक प्रबोधिनी, अंतर्गत तक्रार निवारण समिती तसेच महाविद्यालयातील सर्व विभागांनी विद्यार्थी केंद्रित विविध कार्यक्रमाचे आयोजन केले. या सर्व राबविलेल्या उपक्रमांचा आरसा या वार्षिक अंकामध्ये आपणास पाहावयास मिळेल.

प्रा. डॉ. भरत सगरे यांच्याकडून २७ हिंदी साहित्य ग्रंथ व पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाकडून स्पर्धा परीक्षेसाठी ५० उपयुक्त ग्रंथ भेट म्हणून मिळाले. याबद्दल त्यांचे मनस्वी आभार. विवेकानंद महाविद्यालयातील प्रबंधक श्री. चंद्रशेखर दोडमनी यांनी महाविद्यालयास रुपये १०,००० देऊन त्यातून येणाऱ्या व्याजातून मिळणारी रक्कम ही बी. ए. भाग ३ मधील द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांस पारितोषिक म्हणून देण्याचा संकल्प केला त्याबद्दल

त्यांचेही मन:पूर्वक आभार. ज्ञानशिदोरी दिनानिमित्त महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू-भगिनींनी प्रेरणा देणारे ग्रंथ विद्यार्थ्यांना भेट देऊन ज्ञानाची शिदोरी विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी मोलाचें योगदान दिले.

या शैक्षणिक वर्षात कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवण्याच्या दृष्टिकोनातून शिक्षक विद्यार्थ्यांच्या दारी हा उपक्रम यशस्वीपणे राबवला. शिवाजी विद्यापीठाच्या विद्याविषय लेखापरीक्षण समितीने महाविद्यालयास भेट देऊन विद्याविषयक लेखापरीक्षण केले. क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांनी इंटरझोनल स्पर्धेमध्ये कुस्ती, ज्यूदो या क्रीडा प्रकारांमध्ये यश संपादन केले. विद्यापीठाच्या युवक महोत्सवात रांगोळी, मेहंदी, वक्तृत्व, मूकनाट्य या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वर्षभर अनेक उपक्रम राबविले. त्याचबरोबर सात दिवसाचे निवासी विशेष श्रमसंस्कार शिबीर मौजे कोतावडे येथे घेण्यात आले.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने अर्थशास्त्र व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महिला बचत गटाचे सक्षमीकरण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेतली तसेच अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत समाजशास्त्र विभागाच्या वतीने प्रसार माध्यमे आणि स्त्रिया या विषयावर तर क्रीडा विभागाच्या वतीने क्रीडा कार्यमनावर परिणाम करणारे मानसशास्त्रीय घटक या विषयावर कार्यशाळेचे अतिशय उत्कृष्ट आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने भिलार येथे सहल. भूगोलशास्त्र विभागाच्या वतीने बोरहोल, भूभौतिकी संशोधन केंद्रास भेट. राज्यशास्त्र विभागाच्या वतीने पंचायत समितीस भेट. अर्थशास्त्र विभागाच्या वतीने बँकेस भेट आणि वाणिज्य विभागाच्या वतीने औद्योगिक भेट आशा विविध अभ्यास सहलींचे यशस्वी आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूरशी तर इतिहास व भूगोल विभागाच्यावतीने मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव यांच्याशी शैक्षणिक सामंजस्य करार (MOU) करण्यात आले.

महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब म्हणजे राज्यशास्त्र विभागातील प्रा. डी. ए. पवार यांना अविष्कार फाउंडेशनचा 'लोकराजा राजर्षी शाहू गौरव पुरस्कार २०२२' मिळाला तसेच भूगोलशास्त्र विभागातील प्राध्यापिका स्वाती चव्हाण यांना शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे वक्तृत्व स्पर्धेत गुरुदेव कार्यकर्ता गटात सांगली विभागात प्रथम क्रमांक मिळाला त्याबद्दल दोघांचेही हार्दिक अभिनंदन. महाविद्यालयात घेण्यात आलेल्या सर्व उपक्रमांची माहिती वर्तमानपत्राच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य करणारे प्रा. कुमार इंगळे यांचेही विशेष अभिनंदन.

डोंगराई अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपले साहित्यिक गुण जोपासून मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत वैविध्यपूर्ण लेखन केले आहे. त्यांच्यातील भावी लेखकास शुभेच्छा या वार्षिक अंकाची संपादक म्हणून जबाबदारी स्वीकारणाऱ्या डॉ. सौ. विजया पवार. विभागीय संपादक प्रा. सुरज डुरे, प्रा. शिवराज उथळे यांनी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने हा अंक वेळेत पूर्ण करण्याचे काम केले. तसेच जाहिरात विभाग प्रमुख प्रा. डी. ए. होनमाने व सर्व प्राध्यापक बंधू भगिनींनी जाहिरातीच्या माध्यमातून अंकास आर्थिक बळ दिले त्याबद्दल सर्वांचे मन;पूर्वक आभार !

महाविद्यालयाची होणारी प्रगती ही सांघिक कामगिरी असते असे मी मानतो. सर्व संस्था पदाधिकारी. महाविद्यालय विकास समिती, कडेपूर गावातील सर्व मान्यवर यांच्या प्रेरणेने आणि माझे सर्व सहकारी प्राध्यापक बंधू-भगिनी, प्रशासकीय अधिकारी, सेवक वर्ग, विद्यार्थी-विद्यार्थीनी. माजी विद्यार्थी, वार्ताहार, जाहिरातदारांचे तसेच सर्व हितचिंतक या सर्वांच्या सहकार्याचे महाविद्यालय प्रगतीकडे वाटचाल करत आहे. त्याबद्दल सर्वांचे मन;पूर्वक आभार व्यक्त करतो. या वार्षिक अंकाचे निश्चितच सर्वजण स्वागत करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

धन्यवाद !

**- प्रभारी प्राचार्य बापूराव पवार**

सर यांनी कॉम्प्युटर च्या माध्यमातून फोटो, अहवाल यासंबंधी मोलाचे सहकार्य केले आहे त्यामुळे वेळेत सर्व काम हो शकले. याशिवाय महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक सौ. ए. ए. हावळे मॅडम, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डी. ए. पवार सर आणि महाविद्यालयातील माझ्या सर्व सहकारी बंधू-भगिनी यांचेही चांगले सहकार्य मिळाले. तसेच महाविद्यालयातील शिक्षकेतर सर्वच कर्मचाऱ्यांचे ही सहकार्य लाभले.

महत्वाचे म्हणजे या अंकाचे छपाई करणारे साईनाथ प्रिंटींग प्रेस चे मुद्रक श्री. विजय साळवे आणि डी.टी.पी. करणारे श्री. प्रविण पाटील यांनीही अंक वेळेत उपलब्ध करून देऊन विशेष सहकार्य केले आहे. या सर्वांच्या सहकार्यातून मी सदर 'डोंगराई' अंक तयार करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

इथे ज्ञानेश्वरांची एक ओवी आठवते.

"तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ।
करूनि घ्यावे हे तुमते । विनविले मिया ॥ (ज्ञा.१.८०)"

ज्ञानदेवांची ही विनंती किती सुंदर आहे ते म्हणतात गीता निरुपणात यदाकदाचित काही न्यून राहिले, कमतरता राहिली तर ती तुम्ही पूर्ण करून घ्या कारण तुमची विद्वत्ता व ज्ञान तेवढे आहे. या जगात शंभर टक्के पूर्ण अशी कोणतीच गोष्ट नसते, प्रत्येक गोष्टीत काहीना काही कमतरता, न्यून असतेच, तसे असेल तर त्याकडे दुर्लक्ष करणे हे खऱ्या ज्ञानी व्यक्तीचे लक्षण असते !

**मुखपृष्ठाविषयी थोडेसे....**

आपल्या अंकाचे मुखपृष्ठ वैशिष्ट्यपूर्ण असावे आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या विषयांवर आधारित असावे हे लक्षात घेऊन मुखपृष्ठाची रचना केली आहे. मुखपृष्ठ ही अंकाची ओळख असते. म्हणून थोडंस हितगुज..... विद्यार्थ्यांनी मुखपृष्ठाविषयी व्यक्त केलेल्या संकल्पनांवर आधारित मुखपृष्ठावरील मुळ चित्र मी स्वतः तयार केलेले आहे. हे नम्रपणे नमुद करते स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील हा अंक असल्याने मुखपृष्ठ भारतीय ध्वजाच्या रंगाशी निगडीत बनविले आहे. या तीन रंगातील प्रतीके येथे वापरली आहेत. या सर्व मुखपृष्ठाला अनुसरून एक स्वरचित कविता दिली आहे. या सर्व कवितेमधून मुखपृष्ठाचा संदेश अधिक बोलका व्हावा ही अपेक्षा !

विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा अविष्कार असणारी ही अक्षरनिर्मिती आपल्यासारख्या रसिकांच्या हाती देत असताना आम्हाला मनापासून आनंद आणि कर्तव्यपूर्तीचे समाधान वाटते आहे. आपण सर्वजण या अंकाचे स्वागत कराल आणि माझ्या संपादनातील हा पहिला प्रयत्न स्वीकाराल अशी आशा व्यक्त करते आणि थांबते.

**- प्रा.डॉ.सौ. विजया पवार**

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

# आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर

## प्राध्यापक वृंद

### ❖ मराठी विभाग
प्र.प्राचार्य श्री.बी.बी.पवार, M.A.B.Ed.,SET
प्रा.के.व्ही.इंगळे, M.A.,B.Ed.,SET
प्रा.डॉ.व्ही.पी.पवार, M.A.,M.Phil, Ph.D., SET,NET

### ❖ हिंदी विभाग
प्रा.सौ.ए.ए.हावळे, M.A.,B.Ed.,M.Phil
प्रा.एस्.व्ही.डुरे, M.A.NET

### ❖ इंग्रजी विभाग
प्रा.ए.एस.दळवी, M.A.,SET, NET
प्रा.एस्.एस.उथळे, M.A.,SET,NET
प्रा.सी.एन.माने-देशमुख, M.A.,M.Phil.SET

### ❖ अर्थशास्त्र विभाग
प्रा.डी.ए.होनमाने, M.A.
डॉ.जे.यु.दिक्षित, M.A.,M.Phil., Ph.D.,SET
डॉ.एस.एम्.कचरे, M.A.,Ph.D.
डॉ.एस.आर.बनकर, M.A.,Ph.D.

### ❖ इतिहास विभाग
डॉ.आर.पी.महानवर, M.A.,B.Ed., M.Phil., Ph.D.,SET
प्रा.एस्.बी.इंगवले, M.A.,B.Ed.,SET

### ❖ राज्यशास्त्र विभाग
प्रा.डी.ए.पवार, M.A.

### ❖ समाजशास्त्र विभाग
प्रा.एस्.वाय.पाटील, M.A.

### ❖ भूगोल विभाग
प्रा.एस.ए.चव्हाण, M.A.,SET,NET
प्रा.ए.डी.कांबळे, M.A.,B.Ed.,Ph.D.

### ❖ वाणिज्य विभाग
प्रा.ए.जी.पोटे, M.Com.,M.Phil.,NET
प्रा.एस.व्ही.वनभट्टे, M.COM.,F.C.A.
प्रा.ए.व्ही.सावंत, M.Com., M.Phil., NET, G.D.C.& A.

### ❖ शारीरिक शिक्षण विभाग
प्रा.ए.एम.व्हटकर. M.P.Ed., SET

### ❖ ग्रंथालय विभाग
प्रा.एन.आर.थोरात, M.Lib, M.Phil., SET

### ❖ शिक्षकेतर कर्मचारी
श्री.आर.डी.पवार
श्री.एस.ए.लोखंडे
श्री.एस.जी.माने
श्री.के.डी.बोंगाळे
श्री.एम.एस.तुरेवाले
सौ.एस.एम.कुंभार

# डोंगराई

२०१९-२०२०

# भावपूर्ण

## श्रद्धांजली

महाविद्यालयातील प्राध्यापक
बंधू-भगिनी आणि त्यांचे नातेवाईक,
संस्था पदाधिकारी, गुरूदेव कार्यकर्ते, कर्मचारी
समाजातील साहित्यिक, समाज सुधारक, राजकारणी,
खेळाडू, संगीततज्ञ, शास्त्रज्ञ, कलावंत व शेतकरी बांधव
जे अनंतात विलीन झाले त्यांना तसेच अपघात,
दहशदतवादी हल्ले व नैसर्गिक आपत्तीमुळे
अनेक ज्ञात-अज्ञात बंधू-भगिनी,
अनंतात विलीन झाले त्या
सर्वांना डोंगराईच्यावतीने

**भावपूर्ण श्रद्धांजली**

# जिमखाना विभाग उपक्रम



शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली येथे आयोजित जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेतील एक क्षण करण जाधव (बी.भाग १)




शिवाजी विद्यापीठ अंतर्गत इचलकरंजी येथे आयोजित विभागीय कुस्ती स्पर्धेतील विजेता शुभम पवार (बी.भाग १)



शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर येथे आयोजित ज्युदो स्पर्धेतील एक क्षण वसिम इनामदार (बी.भाग १)




महाविद्यालयातील क्रीडा स्पर्धेत कब्बड्डी खेळताना विद्यार्थी



आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त योगासनाची प्रात्यक्षिके करताना महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी



महाविद्यालयाच्या वार्षिक क्रीडा महोत्सव प्रसंगी व्हॉली बॉल खेळताना विद्यार्थी



क्रीडा विभाग आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन उपक्रमांतर्गत व्याख्यान देताना प्रा.आशा सावंत




क्रीडा विभाग आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन उपक्रमांतर्गत व्याख्यान देताना प्रा.शीला मोहिते

डोंगराई

आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर 2021-22

# सहल विभाग क्षणचित्रे




भूगोलशास्त्र विभागातर्फे बोरहोल भूभौतिकी अनुसंधान प्रयोगशाळा, राजमाची येथे भेट



कॉमर्स विभागातर्फे डोंगराई सहकारी सूतगिरणी मर्यादित, कडेगाव येथे भेट




राज्यशास्त्र विभागातर्फे पंचायत समिती, कडेगाव येथे शैक्षणिक भेटीवेळी विद्यार्थी-अधिकारी व प्रा.डी.ए. पवार



ग्रंथालय व मराठी विभागातर्फे वाई, पुस्तकाचे गांव भिलार व महाबळेश्वर येथे शैक्षणिक सहल




अर्थशास्त्र विभागातर्फे डॉ.पतंगराव कदम सोनहिरा सहकारी कारखाना मर्या.वांगी येथे शैक्षणिक भेट




अर्थशास्त्र विभागातर्फे सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि,सांगली शाखा येथे शैक्षणिक भेट



वाई येथील ढोल्या गणपती मंदिरास महाविद्यालयाची क्षेत्र भेट



पुस्तकाचे गांव भिलार येथे विद्यार्थी व प्राध्यापक विविध दालनांची माहिती घेताना

# महाविद्यालयातील विविध उपक्रम



विद्याविषयक लेखापरीक्षणासाठी उपस्थित समिती प्रमुख प्राचार्य डॉ.पी.बी.लाडगावकर, प्रा.जी.एस.खानसोले



विद्याविषयक लेखापरीक्षणाला सामोरे जाताना प्रा.दिलीप पवार, डॉ.जयदिप दीक्षित, प्रा.आशा सावंत, सौ.प्रा.सौ.सुशिला इंगवले



भूगोलशास्त्र विभाग व कन्या महाविद्यालय, कडेगांव यांच्यातील सामंजस्य करार



इतिहास विभाग व कन्या महाविद्यालय, कडेगांव यांच्यातील सामंजस्य करार.



समाजशास्त्र विभाग व कन्या महाविद्यालय, कडेगांव यांच्यातील सामंजस्य करार



मराठी विभाग व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्यातील सामंजस्य करार



मराठी भाषा गौरव दिनानिमित्त व्याख्यान देताना प्रा.कुमार इंगळे, प्र.प्राचार्य श्री.बापूराव पवार,प्रा.डॉ.विजया पवार व इतर



जागतिक महिला दिन व माता पालक मेळावा दिनानिमित्त बोलताना ॲड.अर्चना महाडिक, मा.सौ.देवयानी यादव-देशमुख

# महाविद्यालयातील विविध उपक्रम



स्पर्धा परीक्षा विभागांतर्गत मार्गदर्शन करताना प्रा.भगवान खोत महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य बी.बी.पवार




ग्रंथालय विभागामार्फत भित्तीपत्रिकेचे उद्घाटन करताना प्र.प्राचार्य बी.बी.पवार, श्रीमती निलिमा थोरात व इतर



जागतिक पुस्तक दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शन प्रसंगी डॉ.अर्जुन वाघ, प्र प्राचार्य श्री.बापूराव पवार, श्रीमती निलिमा थोरात व इतर



भूगोलशास्त्र विभागातर्फे माझी वसुंधरा दिनानिमित्त डॉ.अर्जुन वाघ, प्र.प्राचार्य बी.बी.पवार, प्रा.स्वाती चव्हाण, डॉ.अरुणा कांबळे



कौशल्य विकास उपक्रमांतर्गत केक बनविण्याच्या कार्यशाळेत प्रात्यक्षिक करताना कु. सिद्धी सावंत, आशा सावंत व इतर




शिक्षक विद्यार्थ्यांच्या दारी या उपक्रमांतर्गत पालकांशी संवाद साधताना प्राध्यापक



जागतिक महिलादिन व माता पालक मेळावा यानिमित उपस्थित मा.सरपंच सौ.रुपाली यादव इतर महिला



माजी विद्यार्थी मेळावा प्रसंगी उपाध्यक्ष मा. लालासाहेब यादव प्र.प्राचार्य बापूराव पवार व माजी विद्यार्थी

# मराठी विभाग

तसे तर शब्द जिवाभावाचे सखेसोबती
श्वासोच्छवासाइतके मला निकटचे क्षणोक्षणी
शब्दांच्या आधारानेच सोसत आले आजवर
प्रत्येक आनंद, आघात, आयुष्यातली अधिक उणी
अजूनही जेव्हा मन भरून येते अनिवार
करावे वाटते स्वत:ला शब्दांपाशी मोकळे
वाटते, त्यांनाच जावे सर्वस्वाने शरण
तेच जाणून घेतील आतले उत्कट उमाळे
तरीही शब्द हाताळताना असते सदैव साशंक
त्यांच्या सुक्ष्म नसा, भोवती धगधगणारा जाळ,
काळीज चिरीत जाणाऱ्या त्यांच्या धारदार कडा
ज्या अवचित करतात विद्ध रक्तबंबाळ
मी तर कधीचीच शब्दांची, ते कधी होतील माझे?
त्यांच्याशिवाय कुठे उतरू हृदयावरचे अदृश्य ओझे?

**- कवयित्री शांता शेळके**
जन्म १२ ऑक्टोंबर १९२२
मृत्यु ६ जून २००२

**प्रा.श्री. कुमार इंगळे**
**विभागीय संपादक**

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | बहुजनांचा दिपस्तंभ डॉ. बापूजी साळुंखे | – कु. सुषमा करकटे | बी.ए.भाग १ | १५ |
| २. | माय मराठी – चिंतनपर लेख | – मेघराज यादव | बी.ए.भाग ३ | १७ |
| ३. | ऑनलाईन शिक्षण : एक चिंतन | – संतोष कुंभार | बी.ए.भाग २ | २० |
| ४. | साहित्य अकादमी प्राप्त लेखक | – आकाश जाधव | बी.ए.भाग २ | २२ |
| ५. | माझे प्रवासवर्णन | – संकेत कणसे | बी.ए.भाग २ | २४ |
| ६. | महात्मा गांधी यांचे विचार | – कु. मेघना भंडारे | बी.ए.भाग २ | २६ |
| ७. | भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | – अक्षय फुके | बी.ए.भाग २ | २८ |
| ८. | जागतिक तापमान वाढ व हवामान बदल | – संदिप मोहिते | बी.ए.भाग २ | ३० |
| ९. | आभासी चलन | – कु.फिजा पटेल | बी.ए.भाग २ | ३२ |
| १०. | धिंग एक्सप्रेस – हिमादास | – विश्वजित कटरे | बी.ए.भाग १ | ३५ |


## पद्य विभाग


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | कोणाकडे काय ? | – अतुल भोसले | बी.ए.भाग ३ | १६ |
| २. | प्रगती | – कु. मानसी करकटे | बी.कॉम.भाग ३ | १६ |
| ३. | दररोज फक्त एवढेच करा ! | – संकलन–महेश कदम | बी.ए.भाग २ | १९ |
| ४. | जीवन | – कु. निकिता वाघमारे | बी.ए.भाग १ | १९ |
| ५. | पाणी जीवनाचे अमृत | – प्रसाद चव्हाण | बी.ए.भाग १ | २५ |
| ६. | कॉलेज | – शुभम कुंभार | बी.ए.भाग १ | २७ |
| ७. | कोणाला काय द्यावे | – कु. गौरी महापुरे | बी.ए.भाग १ | २७ |
| ८. | एखादाच असतो.. | – कु. भारती राठोड | बी.ए.भाग ३ | २९ |
| ९. | विचार पुण्य | – कु. वैष्णवी भिंगारदेवे | बी.कॉम.भाग १ | ३४ |
| १०. | नाहीसे होत चाललेले ग्रामीण शब्द | – शुभम कुंभार | बी.ए.भाग १ | ३६ |

राजकारभारात आणि समाजकारणात प्रभावी कार्ये करीत असतानाच बापूजी १९४५ साली बी.ए. झाले आणि त्याच वर्षी सातारा जिल्हा विद्यार्थी काँग्रेसचे व कर्मवीर भाऊराव पाटील गौरवनिधी समितीचेही अध्यक्ष झाले. बापूजींनी पाच खंडात आणि नव्वद पृष्ठात सातारा जिल्ह्याचा 'क्रांति इतिहासात' क्रांतिकारकांच्या रोमांचकारी कथा विशेष परिश्रमाने लिहिलेल्या आहेत. २७ नोव्हें. १९४८ या कर्मवीरांना गौरवनिधी अर्पण सोहळा दिनापूर्वी बापूजींनी रयत शिक्षक म्हणून प्रवेश केला होता. बापूजी हाडाचे शिक्षक होते. शाळा वाढवित असतानाच बापूजी १९४९ साली बी.टी. झाले. १९५० साली दहावी, तर १९५१ ला ११ वीचा वर्ग काढला आणि अवघ्या तीन वर्षात हायस्कूल पूर्ण केले. यावरून बापूंच्या कामाचा आवाका ध्यानात येतो. रयत शिक्षण संस्थेतून बाहेर पडल्यानंतर १२ ऑक्टोंबर १९५४ साली नवीन संस्था स्थापण्याचा विचारविनिमय बापूजींनी केला आणि त्यासाठी स्वामी विवेकानंदाचे नाव स्वीकारण्यात आले.

अशा प्रकारे विवेकानंद संस्थेच्या निर्मितीन्वये खेड्यापाड्यातील लाखो विद्यार्थ्यांपर्यंत विद्यादानाची सांस्कृतिक गंगा नेऊन उदात्त चारित्र्यातून उज्वल, त्यागी आणि आदर्श विचार रुजविणाऱ्या या महान तत्वचिंतक शिक्षण महर्षीने पडत, उठत, धडपडत, जीवनध्येय आणि जीवनमुल्ये शेवटपर्यंत जपली.

बापूजी ! ''तुम्ही तुमच्या कृतीतून समाजाला जे दाखवून दिलंत, ते आमच्या उक्तीतून तरी साधता येईल का?

❖❖❖

# कोणाकडे काय?

| | | |
|---|---|---|
| पित्याकडे | – | कर्तव्य |
| श्रीमंताकडे | – | गर्व |
| आईकडे | – | वात्सल्य |
| वडिलांकडे | – | भविष्य |
| कवीकडे | – | कल्पना |
| बहिणीकडे | – | प्रेम |
| गुरुकडे | – | ज्ञान, विद्या |
| शत्रूकडे | – | द्वेष, मत्सर |
| मैत्रिणीकडे | – | बलिदान |
| मुंगीकडे | – | शिस्त |
| विद्यार्थ्याकडे | – | जिज्ञासा |
| वंदनाकडे | – | परोपकार |
| शिक्षकांकडे | – | विश्व कल्याण |

– **अतुल भोसले** बी.ए.भाग ३

# प्रगती



**लहान थोरांनी शाळेत यावे**
**शिक्षण शिकून मोठे व्हावे**
**शिक्षणाने मिळते ज्ञान**
**जीवन सुखी बनते आनंदी आनंद**
**आता नवीन तंत्रज्ञानाचे युग आहे**
**रेल्वे, सायकली, कार विमाने**
**पक्षाप्रमाणे धावत आहे**
**समुद्रातून बोटीमध्ये बसून**
**व्यापारी, प्रवासी जात आहेत**
**अनेक कारखाने उभे राहिले आहेत**
**घरबसल्या फोनने बोलणे सोपे झाले आहे**
**विद्युत प्रकाशामुळे उजेड पसरला**
**ग्रोमोफोन ही चांगला बोलू लागला**
**घड्याळाद्वारे वेळ समजू लागला**
**पाईपने चौथ्या मजल्यावर पाणी आले**
**ही सर्व बुद्धिमतेची कमाल आहे.**
**यापासून दुरावला तो संपला**
**हे माणसाचे भाग्य उजळले आहे.**
**प्रगतीची वेळ आली आहे**
**नुसती भाकरी खाणे ही प्रगती नव्हे**
**शिका, नवे तंत्र वापरा हीच प्रगतीची दिशा**

– **कु. मानसी करकटे** बी.कॉम.भाग ३



# बहुजनांचा दिपस्तंभ - डॉ.बापूजी साळुंखे

(व्यक्तिचित्रणात्मक लेख)

- कु. सुषमा करकटे
बी.ए.भाग १

खादीची टोपीही त्यांना शोभून दिसे. गोविंदराव जसे अभ्यासू तसेच विवादपटू होते. पांढऱ्या शुभ्र पोषाखात जसे गोविंदराव वेगळे आणि उठून दिसत त्याचप्रमाणे वादविवादात ते नेहमीच सरस ठरत.

महात्मा गांधींची शिकवण आणि प्रेरणा घेऊन ज्या व्यक्ती समाजसेवेत व्यग्र झाल्या, त्यापैकी डॉ. बापूजी साळुंखे हे एक होते. समाजातील तळागाळातील माणसांना शिक्षण मिळाल्याशिवाय सारा समाज स्वाभिमानाने आणि स्वावलंबाने ताठ उभा राहणार नाही. असा विचार करून त्यांनी ज्ञानदानाला वाहून घेतले. स्वातंत्र्य चळवळीत स्वत:ला झोकून दिले. समाजप्रबोधन आणि लोकशिक्षण हाच महत्त्वाचा धागा त्यांनी पकडला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात दूरवर, दुर्गम, डोंगराळ, मागासलेल्या भागातील, उपेक्षित खेड्यांत आपल्या संस्थेमार्फत विद्यादानाची सांस्कृतिक केंद्रे त्यांनी निर्माण केली.

महाराष्ट्रातील सुसंस्कृत आणि प्रतिष्ठित घराण्यात एका असामान्य बालकाचा जन्म ९ जून १९१९ च्या शुभदिनी सातारा जिल्ह्यातील रामापूर नामक छोटेखानी गावी झाला. ज्ञानोजी साळुंखे यांना पाच पुत्र आणि दोन कन्या होत्या. ज्ञानोजींना पदरी पडलेलं शेवटचं आणी सुमधुर फळ म्हणजे गोविंद. आणि गोविंद म्हणजे साळुंखे वंशाचा कुलदीपक, हा बालक एक वर्षाचा असतानाच माता 'तानुबाई' देवाघरी गेल्या आणि बाराव्या वर्षी ज्ञानोजींनी या बालकाची सोबत अर्ध्या वाटेतच सोडली.

माता-पित्याच्या वियोगानंतर गोविंदाने प्रतिकूल परिस्थितीशी सामोरे जात आपले प्राथमिक शिक्षण रामापुरात पुर्ण केले. ज्ञानोजींच्या मृत्युनंतर साळुंखे कुटुंबियाची आर्थिक स्थिती फारच खालावली. सातवी उत्तीर्ण झालेल्या गोविंदाने नोकरी करावी. अशी वडीलबंधू महादेव त्यांनी इच्छा व्यक्त केली. पण गोविंदाला त्याचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी आणि त्याचे पुढील भवितव्यासाठी आपले जन्मगाव रामापूर सोडून वडीलभाऊ परशुराम यांच्याकडे इस्लामपुरात प्रवेश केला. गोविंदाने हायस्कुलच्या तीन इयत्ता इस्लामपूर येथे पूर्ण केल्या. सत्य, अहिंसा, ईश्वरप्रेम, राष्ट्रभक्ती, मानवप्रेम या गांधीजींच्या तत्वांचा त्यांच्यावर मोठा पगडा होता. ते सफेद सदरा-धोतर असा अगदीच साधा पोषाख वापरीत. खादीची टोपीही त्यांना शोधून दिसे. गोविंदराव जसे अभ्यासू तसेच विवादपटू होते. पांढऱ्या शुभ्र पोषाखात असे गोविंदराव वेगळे आणि उठून दिसत त्याचप्रमाणे वादविवादात ते नेहमीच सरस ठरत. त्यांची ही कृती पाहून श्री.आर.डी. पाटील यांनी सर्वत्रप्रथम गोविंदरावांचे बापूजी असे नामकरण केले आणि सर्वजण त्यांना 'बापूजी' म्हणू लागले. आज सगळेच त्यांना 'बापूजी' म्हणून ओळखतात.

क्रांतिसिंह नाना पाटलांच्या सोबतीने बापूजींनी १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात स्वत:ला झोकून दिले. साताऱ्यातील प्रतिसरकारात बापूजींनी न्यायदानाचे काम पाहिले. बापूजींच्या स्वातंत्र्य संग्रामातील सहभागाबद्दल सन्मानपत्र बहाल केले तर महाराष्ट्र राज्याने भूमिगत आंदोलनासाठी सहभागामुळे बापूजींना सन्मानपत्र देऊन गौरविले होते.

सातवाहन आणि यादवांच्यानंतर ते काम पुढच्या काळात शिवाजी महाराजांनी सुद्‌धा केले. महाराजांनी मराठी पुन्हा एकदा राजभाषा बनवली. त्यांनी त्यावेळी मराठीला राज्यकारभाराची भाषा केली. 'राज्यव्यवहार कोश' ही करून घेतला. भाषेच्या वृध्दीला अनेक सत्तेचे पाठबळ मिळाले. जेव्हा भारतात ब्रिटिश आले तेव्हा ब्रिटिशांना मराठी भाषेशी सामना करावा लागला. त्याकाळी भारतात मराठी भाषेचा प्रभाव खूप होता. म्हणून इथे राज्य करायचे असेल तर मराठी आपल्याला यायला पाहिजे म्हणून कोलकत्ता येथील ब्रिटीशांच्या प्रशासकीय महाविद्यालयात त्यांचेवेळी ब्रिटिश युवकांना मराठी शिकवणे हे सक्तीचे केले होते म्हणूनच तर –

''भवानी आमची आई
शिवाजी आमचा राणा
मराठी आमुची बोली
गनिमी आमचा बाणा''

मराठी राज्याच्या एकूण वाटचालीत सातवाहन, यादव, शिवाजी महाराज, ब्रिटिश, अनेक संत, कवी यांच्या योगदानामुळे मराठी भाषा आजपर्यंत ताठमानेने उभी आहे.

संत, पंत, तंत कवींनी सजविलेली मराठी भाषा नंतर विष्णूशास्त्री चिपळूणकर, लो. टिळक, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अधिक समृध्द व कणखर बनवली. मराठी भाषा सिंह गर्जना करू लागली, पण सध्याची परिस्थिती पाहता मराठी भाषेविषयी काळजी वाटते. 'मराठी' असे आमुची मायबोली ही कवी माधव ज्युलियन यांची काव्यरचना फक्त काव्यच बनून राहिलेली दिसते आहे. मराठी ही आपल्या राज्याचा राजकीय पाया आहे हे अतिशय महत्त्वाचे विधान आहे. 'आधी ती, दरबारात आणि राज्य कारभारात आलेली भाषा' असा उल्लेख केला जाई. पण आता इंग्रजी भाषेचा प्रभाव वाढत असल्यामुळे मराठी भाषेचे महत्त्व कमी होऊ लागले आहे. या स्पर्धात्मक युगात इंग्रजी भाषेचा प्रभाव वाढत असल्याने मराठी माणसालासुद्धा मराठीत बोलण्याची लाज वाटू लागल्याने मराठीत रोख–ठोकपणे आपली बाजू मांडणे. आपले विचार, मते मांडण्यात कमीपणाचे वाटत आहे. इतकेच नव्हे तर शाळा महाविद्यालयातही मराठी भाषा उपेक्षित ठरू लागली.

मराठी साहित्यात अनेक प्रवाह निर्माण झाले. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य असे अनेक प्रवाह स्वतंत्रपणे मराठी भाषेत उभे आहेत. मराठीने अनेक समूहांना स्वर दिला आहे. विविध साहित्य मांडण्याकरिता आमच्या मराठीकडे शब्दवैभव आहे. ओवीपासून लावणीपर्यंत आणि अभंगापासून पोवाड्यापर्यंत महाकाव्यांपासून हायकूपर्यंत अनेक आकृतीबंध मराठीत निर्माण झाले. दबलेल्यांच्या आवाजाला न्याय मिळवण्यासाठी अन्य भाषांमध्ये खूप अडथळे आहेत. पण मराठीने सगळ्यांनाच ऊर्जास्थल स्वर दिला आहे.

आपली भाषा येथील शेतकऱ्यांनी, मजुरांनी, कष्टकऱ्यांनी लोककलावंतांनी, साहित्यिकांनी निर्माण केली आहे. स्त्रियांनी भाषा घडवली आहे. या भाषेचा आपण उत्सव करतो. ही अभिमानाची गोष्ट असायला हवी. मराठी माणूस सणप्रिय, उत्सवप्रिय आहे. परंपरेनं आलेलं आपलं साहित्य हे धर्माला समाजाला जोडून आलेलं आहे. जागरण, गोंधळ, प्रवचन, किर्तन हे आमच्या सांस्कृतिनं रसिकतेनं वाढवलेलं साहित्यच आहे. तेच आपलं वैभव आहे. साहित्य संमेलन भरवणे, साहित्याचा उत्सव साजरा करणे हा मराठी धर्म आहे.

सुमारे आठशे वर्षापासून चालत आलेली 'मराठी' ची मशाल मध्येच खाली ठेवण्याचा अवसानघातकीपणा करायला नको 'मनही मराठीचे आणि बुध्दीही मराठीची असे हात उंचावून गर्वाने, अभिमानाने सांगता आले पाहिजे. स्वत्राणाने फुंकलेल्या तुतारीतून निनाद सर्वत्र घुमला पाहिजे.




# माय मराठी

(चिंतनपर लेख)

– मेघराज यादव
बी. ए. भाग ३
मराठी विभाग

आपल्या देशात सुमारे वीस प्रमुख भाषा आहेत. जवळजवळ ४०० बोलीभाषा आहेत. त्यातलीच एक प्रमुख भाषा म्हणजे आपली 'मराठी' भाषा होय. आपल्या महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. ११ जानेवारी १९६५ रोजी आपल्या राज्याची राजभाषा 'मराठी' म्हणून मान्यता मिळाली. जगात मराठी भाषेचा दहावा क्रमांक आहे.

मराठी ही महाराष्ट्र राज्याची राजभाषा आहे. महाराष्ट्रातील १२ ते १५ कोटी लोक मराठी भाषा बोलतात. भारतातील इतर प्रांतातही अनेक ठिकाणी लोक मराठी भाषा बोलतात. प्राचीन भारतात संस्कृत भाषा लिहिली व बोलली जात होती. पण बऱ्याच लोकांना संस्कृत भाषा येत नसल्यामुळे बरेच लोक आपल्या गावटी भाषेत संस्कृतचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करत असत. पण त्यांची भाषा वेगळी होऊ लागली. या वेगळेपणालाच प्राकृती मराठी असे म्हणतात. महाराष्ट्रात विविध लहान–मोठ्या प्रदेशा–नुसार प्राकृत भाषेतून इतर अनेक भाषा निर्माण झाल्या आणि त्यातूनच 'महाराष्ट्री व अपभ्रंशी' यातून आपली सध्याची अभिजात मराठी भाषा उदयाला आली.

इ.स. पूर्व काळातील भारतातील एक महत्वाची आणि शक्तिशाली राजवट होती सातवाहनांची. याच सातवाहनांची राजभाषा म्हणजे महाराष्ट्री प्राकृत. मराठीचे आद्यरुप असणाऱ्या या भाषेला सातवाहन काळात अतिशय मानाचे महत्वाचे स्थान होते. हा सन्मान संपूर्ण भारतात होता. या काळात या भाषेने आपली मोहर उमटवली होती. या काळात प्राकृत हीच दैनंदिन व्यवहाराची भाषा म्हणून स्वीकारली होती या योगदानामुळेंच ही भाषा टिकली व वृध्दिंगत होत गेली.

मराठी भाषेतला पहिला शिलालेख कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या (बाहुबलीच्या) पुतळ्याखाली आढळतो. इ.स.९८३ च्या सुमारास तिथे 'श्री चामुंडराये करवियले' हे मराठी वाक्य कोरलेले आढळले. त्याच ठिकाणी कोरलेले 'गंगाराये सुत्ताले करवियले' हे वाक्य इ.स. ११०० च्या सुमारास कोरले गेले असावे असे सांगतात.

तेराव्या शतकात श्रीचक्रधर स्वामी, मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर यांनीसुद्धा आपआपले तत्वज्ञान हे प्राकृतामधून मांडले आहे. ज्ञानियाचा राजा संत ज्ञानेश्वर मराठी भाषेचा गौरव करताना म्हणतात –

''माझा मऱ्हाटीची बोलु कौतुके ।
परि अमृतातेही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ।।''

संत ज्ञानेश्वरांचा मराठी भाषेविषयीचा आत्मविश्वास या बोलांनी सार्थ ठरविला आहे. मायबोली म्हणजे नेमके काय? तर अमृताशी पैजा जिंकणारी, अमृतापुढे कायम टिकणारी अशी महाराष्ट्राची संस्कृती जपणारी अशी ती आपली मायबोली होय अनेक संत, पंत, तंत, महंतांनी भक्तीच्या मार्गाने मराठी भाषा अधिक सात्विक बनवली तर पंडित कवींनी मराठी मायबोलीला प्रगल्भता मिळवून दिली.

मराठी भाषा टिकविण्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम उपक्रम हातात घेण्याची इच्छाशक्ती असणे गरजेचे आहे. साहित्य संमेलनाप्रमाणेच जिल्हा, तालुका–स्तरांवरही संमेलने पहायला हवीत. अशा संमेलनांना पाठिंबा दिला पाहिजे त्यामुळे त्या त्या क्षेत्रातील लेखक पुढे येतात. सांस्कृतिक लोकशाही–साठी मराठीला जगवले पाहिजे, ही भाषा अधिकाधिक समृध्द करण्यासाठी झटले पाहिजे. छोटी संमेलने घेणे, तरुणांना एकत्र आणणे, त्यांच्याशी चर्चा करणे, भाषा विषयक वेगवेगळे उपक्रम घेणे, व्याख्याने देणे ही काळाची गरज आहे.

मराठी भाषेचे सौंदर्य हे आजही झळाळणारे आहे. मराठी ही ताकदवान भाषा आहे. शिवरायांसारखे शूर राजे आपल्या मराठी भूमीत होऊन गेले. शौर्यांच्या कथा सांगताना ती तडफदार होते तर कायद्याचा कीस पाडण्याचे काम मराठी भाषा यशस्वीपणे पार पाडते. मराठी ही सक्षम भाषा. मराठी म्हणजेच देशासाठी मरणारा व मारणारा तो मराठी.

''लाभले आम्हास भाग्य,
बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी''

❖❖❖

## दररोज फक्त एवढच करा !

दुःख – Delete
आनंद – Save
नाते – Recharge
मैत्री – Download
शत्रुत्व – Erase
खरे – Broadcast
खोटे – Switch off
तणाव – Not reachable
प्रेम – Incoming
दुःख – Out going
हास्य – Inbox
अश्रू – Outbox
राग – Hold
स्मितहास्य – Send
मन – Vibrate
मग बघा – आयुष्य किती सुंदर आहे ते....

संकलन – महेश कदम
बी.ए.भाग १

## जीवन

आयुष्य म्हणजे एक नाटक आहे
आपण म्हणजे त्यातील पात्रे आहोत
दुःख हा त्यातील खलनायक आहे
सुख हा त्यातला अभिनेता आहे
मन हा निपुण दिग्दर्शक आहे
तर मेंदू हा सूत्रधार आहे
आयुष्यातील संघर्ष
त्यातील मारामारी आहे
कलागुणांचा वापर म्हणजे
तिकिट विक्री आहे
तर मनमोकळा स्वभाव हा
हाऊसफुलचा बोर्ड आहे



बालपण ही आयुष्यातील चैन आहे
तारुण्य आयुष्यांचा इंटरव्हू आहे
वृध्दापकाळ म्हणजे पडदा
पडण्याची वेळ आहे !

– कु. निकिता वाघमारे
बी.ए.भाग १



# ऑनलाईन शिक्षण एक चिंतन

– संतोष कुंभार
बी.ए.भाग २

(चिंतनपर लेख)

कोरोना महामारीच्या काळात भारतातच नाही तर संपूर्ण जगात शिक्षण कसे घ्यायचे हा मोठा प्रश्न उभा राहिला होता. मुलांना ऑनलाईन शिक्षण घेणे अपरीहार्य झाले. भारतात नाही तर पूर्ण जगामध्ये शाळा, महाविद्यालये बंद असल्याने मुलांना ऑनलाईन शिक्षण हा एमकेव पर्याय राहिला. सर्व ठिकाणाची महाविद्यालये बंद असल्याने मुलांना शिक्षण घेण्यासाठी घराच्या बाहेर पडता येत नव्हते. याच कारणाने सरकारने ऑनलाईन शिक्षण चालू करा अशी सूचना महाविद्यालयांना तसेच इतर शाळांना दिली. मुलांचे नुकसान होऊ नये म्हणून ऑनलाईन शिक्षण हा एक चांगला उपक्रम आहे. आणि हाच उपक्रम विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उपयुक्त ठरलेला दिसून येतो. ऑनलाईन शिक्षण हे नविनच असल्याने त्यासाठी लागणारी उपयुक्त माध्यमे मुलांना मिळाली त्यामुळे मुलांच्या प्रगतीत वाढ होण्याचे एक साधन मुलांना मिळत गेले. ऑनलाईन शिक्षणामुळे मुलांना जे पाठ महाविद्यालयात शिकवले जात होते तेच पाठ आज मुलं घरबसल्या शिकत होती. तसे मुलांचे मन रमत होते. ऑनलाईन शिक्षणामुळे तसे पाहता मुलींची प्रगतीकडे वाटचाला होऊ लागली. आणि मुलांच्या बौद्धिक गुणवत्तेत वाढ होऊ लागली आणि ऑनलाईन शिक्षणामुळे मुलांचा वाया जाणारा वेळ शिक्षणासाठी खर्चीक होऊ लागला.

ऑनलाईन शिक्षण कोरोनाच्या काळात शिक्षण घेण्यासाठी मिळालेली एक संधीच म्हणता येईल परंतू खूप पूर्वीपासून प्रगतशील राष्ट्रांमध्ये ऑनलाईन शिक्षणावर भर दिला गेला आहे. जसे की अमेरिका– सारख्या प्रगतशिल राष्ट्रांमध्ये खूप पूर्वीपासून ऑनलाईन शिक्षण चालू आहे. आणि त्यामुळे या राष्ट्रांमध्ये ऑनलाईन शिक्षणासाठी लागणाऱ्या सुविधा विकसीत झाल्या आहेत. तसे पाहता आपल्या देशाचा विकास इतका नाही. ऑनलाईन शिक्षणासाठी लागणारे इंटरनेट प्रत्येक टोकाला पोहोचेल याची शाश्वती नाही. भारत देश हा शेतकऱ्यांचा देश मानला जातो. आणि भारतातील बहुतेक लोक हे शेतकरी वर्गातले आहेत. त्यामुळे ऑनलाईन शिक्षणासाठी मुलांना लागणारी साधने जसे की मोबाईल, लॅपटॉप, कॉम्प्युटर मुलांना उपलब्ध करून देणे पालकांना सहज शक्य नव्हते. यामुळे ग्रामीण भागात शक्यतो ऑनलाईन शिक्षण घेणे मुलांना जमत नव्हते. आणि ग्रामीण भागात ऑनलाईन शिक्षणासाठी लागणारे इंटरनेट पोहोचले नाही. त्यामुळे मुलांना शिक्षण घेण्यास अडचण येत होती. जगभर पसरलेल्या कोरोनाने वातावरण अस्थीर झाले होते. यामुळे मुलांना वर्गामध्ये बसून शिक्षकांशी जो संवाद होत होता तो थांबला गेला. आणि जी मुले नुकतीच अंगणवाडीतून पहिलीच्या वर्गात जाणार होती. त्यांचं काय? हा प्रश्न उभा राहिला ज्यांनी धड शाळा ही पाहिली नाही त्यांना ऑनलाईन शिक्षण काय समजणार ह्या मुलांना क, ख, ग, घ हे शिकण्याची वेळ होती तीच मुले आज मोबाईलवर ऑनलाईन शिक्षण कशी घेणार. ज्याप्रमाणे ऑनलाईन शिक्षण घेणे सोईस्कर होते

त्याचप्रमाणे ऑनलाईन शिक्षणाचे काही फायदे आणि तोटे ही आहेत.

ऑनलाईन शिक्षणामुळे मुलांना भरपूर प्रकारचे फायदे झाले. यामध्ये मुलांना सकाळी लवकर उठून तयार करणे किंवा मुलांना जेवनाचा डबा तयार करून देणे ही सर्व कामे महिलांची थांबली गेली. तसेच ऑनलाईन शिक्षणाला आधुनिक प्रकारचे साधन मानले जाऊ शकते. ज्यामध्ये मुलांना लांबचा प्रवास करून फळ्यासमोर शिक्षण घेत बसण्यापेक्षा घरी बसून मोबाईल, लॅपटॉप, कॉम्प्युटरच्या माध्यमातून शिक्षकांशी संपर्क साधता येत होता. जो पाठ आज मुले फळ्यावर पाहत होती तोच पाठ आज ऑनलाईन शिक्षणाद्वारे मोबाईलवर दिसत होता. त्यामुळे मुलांचे मन त्यात रमून गेले होते. आणि महत्वाचे म्हणजे ऑनलाईन शिक्षणामुळे मुलांना विविध प्रकारची माध्यमे हाताळता येत होती. ज्यामुळे मुलांना शिक्षण काय आहे हे समजत होते. ऑनलाइन शिक्षणामुळे मोबाईलचा वापर चांगल्या कामासाठी होऊ लागला. जी मुले मोबाईलवर गेम खेळताना दिसायची तीच मुले आज ऑनलाईन शिक्षण घेत असताना दिसू लागली. आणि महत्वाचे म्हणजे मुलांची वर्षे वाया जात होती ती ऑनलाईन शिक्षणामुळे सुरळीत चालू झाली. खरं तर ऑनलाईन शिक्षण हे डिजिटल शिक्षण मानले जाऊ शकते. ज्याच्यामुळे मुलांना समजून घेण्यास अधिक सोपे जात होते. ज्यामुळे मुलांच्या प्रगतीत वाढ होण्यास मदत होत होती. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ऑनलाईन शिक्षणामुळे पाहण्याचा दृष्टीकोन बदलताना आपल्याला दिसून येतो. ज्याप्रमाणे मुलांना ऑनलाईन शिक्षण समजण्यास मदत होत होती त्याचप्रमाणे मुलांच्या बौद्धिक गुणवत्तेत वाढ होताना आपल्याला दिसत आहे. ज्याप्रमाणे नाण्याला दोन बाजू असतात त्याचप्रमाणे ऑनलाईन शिक्षणाचे जसे फायदे आहेत तसे तोटे ही आहेत.

ऑनलाईन शिक्षणामुळे मुलांना तासन्तास मोबाईल समोर बसावे लागत होते. ज्यामध्ये शिक्षण विद्यार्थ्यांना शिकवत होते. त्याकडे मुलांनी एकटक पाहत बसल्याने मुलांना डोळ्याचा त्रास होऊ लागला. यामुळे मुलांना ऑनलाईन शिक्षण घेणे अवघड जात आहे. ज्या वेळी मुले महाविद्यालयात जात होती त्यावेळी मुले आपल्या मित्रांशी गप्पा मारायची. मित्रांसोबत मैदानी खेळ खेळले जात होते ते बंद झाल्याने मुले मित्रांपासून दूर जात होती आणि महत्वाचे म्हणजे मुले मैदानी खेळापासून दूर गेली. ज्या वयात मुले मैदानी खेळ खेळतात. त्याच वयात आज मुले ऑनलाईन शिक्षण घेत होती. घराबाहेर पडता येत नसल्याने सकाळी लवकर उठून मुले व्यायामाला जायची तो व्यायाम थांबल्याने मुलांच्या शरीरावर मोठा परिणाम होत गेला. महत्वाचे म्हणजे मुलांना घराच्या बाहेर पडता येत नव्हते. त्यामुळे मुले कंटाळली. पालक आणी मुले जास्त वेळ एकत्र असल्याने पालकांत व मुलांत वाद होऊ लागले. घरी बसून असल्या कारणाने मुले आपला वेळ मोबाईलवर घालवत होती. तासंन्तास मुले गेम खेळत होती. महाविद्यालयातील शिक्षक मुलाना घरी अभ्यास द्यायचे व तो दुसऱ्या दिवशी तपासायचे. ऑनलाईन शिक्षणामुळे शिक्षक मुलांना अभ्यास द्यायचे पण मुले तो पुर्ण करत नसल्याने मुलांच्या गुणवत्ता थांबली गेली. जास्त तर मुले आपला वेळ व्हिडिओ पाहण्यात घालवायची आणी ऑनलाईन शिक्षण चालू असताना मुलांचे लक्ष विचलीत होऊ लागले आणी मुले शिक्षण घेण्यापेक्षा आपला वेळ दुसरीकडे घालवत होती.

ऑनलाईन शिक्षणामुळे व्हिडिओद्वारे मुलांना शिक्षण मिळत होते. त्यामुळे मुलांचे लक्ष शिक्षणाकडे ओढले जाऊ लागले आहे. ऑनलाईन शिक्षणामुळे मुलांना विविध प्रकारची साधने हाताळायला मिळते आहेत हे एक वरदान ठरत आहे. नवीन युगाची ऑनलाइन शिक्षण ही एक मागणी आहे. चला मग ऑनलाईन शिक्षणाकडे चांगल्या दृष्टीने पाहूया !

❖❖❖



# साहित्य अकादमी प्राप्त लेखक


प्रणव सखदेव


संजय वाघ


किरण गुरव

- आकाश जाधव
बी.ए.भाग २

आखिल भारतीय पातळीवरती २० भारतीय भाषांमध्ये उत्कृष्ट लेखन करणाऱ्या लेखकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी एकूण २२ प्रादेशिक भाषांसाठी युवा पुरस्कार घोषित झाले.

या वर्षाचा मराठीतील युवा लेखक प्रणव सखदेव यांना युवा साहित्य पुरस्कार तर किरण गुरव यांना साहित्य अकादमीचा मुख्य पुरस्कार मिळाला तर बाल पुरस्कार संजय वाघ यांना मिळाला.

प्रणव सखदेव यांच्या 'काळे करडे स्ट्रोक्स' या कादंबरीसाठी वर्ष २०२१ चा ''साहित्य अकादमी युवा पुरस्कार मिळाला. प्रणव सखदेव लेखक, कवी, बाल-साहित्य व अनुवादक आहेत. ते वृत्तपत्रीय लिखानही करतात. 'पायऱ्याचा गेम आणि इतर कविता' हा कवितासंग्रह, निळ्या दातांची दंतकथा, नाभितून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य' हे कथासंग्रह व काळेकरडे स्ट्रोक्स, ९६ मेट्रोमॉल या त्यांच्या कादंबऱ्या प्रकाशित आहेत. त्यांनी अग्रगण्य मराठी दैनिकांत पत्रकार म्हणून काम केले असून ते संपादक व अनुवादक म्हणून कार्यरत आहेत. अनुवाद प्रकल्पासाठी त्यांना २०१५-१६ सालची 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'ची अभ्यासवृत्तीही मिळाली आहे. त्यांना लेखनासाठी महत्वाची पारितोषिके मिळाली आहेत. त्यांनी इंग्रजीतल्या गाजलेल्या पुस्तकांचा अनुवाद केला आहे. आजच्या तरुणांची मानसिकता, त्यांचे प्रश्न, विखंडित जगणे व तंत्रज्ञानाचा वाढता वापर या सगळ्यांचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात दिसून येते.

'काळेकरडे स्ट्रोक्स' ही कादंबरी आजच्या जगण्याचे संदर्भ घेत तरुणाईचे एक वेगळे भावविश्व, त्यातील अवर्तने व आंदोलने उभी करते. या कादंबरीतील पात्रांच्या जीवनात चांगले साकारायला जावे आणि सतत फटकाऱ्यांनी चित्राचे सौंदर्य बिघडावे असे प्रसंग घडतात. तरुणाईचे विस्कटलेले भावविश्व प्रवण सखदेव यांनी कादंबरीत उत्तमरित्या मांडले आहे.

डॉ. किरण गुरव यांच्या ''बाळूच्या अवस्थां-तराची डायरी' या पुस्तकासाठी साहित्य अकादमीचा मुख्य पुरस्कार मिळाला. प्रतिक्रिया देताना डॉ. किरण गुरव म्हणाले की, हा पुरस्कार म्हणजे माझ्याबरोबरच कथा या साहित्य प्रकाराला बळ देणारा हा पुरस्कार आहे. खेड्यापाड्यातील नव्याने लिहितं होणाऱ्या मुलांना कथा हा साहित्यप्रकार त्यातल्या वेल्हाळ-पणामुळे खूप आपलासा वाटतो, 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' या शीर्षक कथेतील बाळू हा शिक्षणासाठी शहराकडे येणाऱ्या मुलांचा प्रतिनिधी आहे. शिक्षणासाठी शहराकडे होणारे बाळूचे स्थलांतर हळूहळू त्याचे मानसिक अवस्थांतर बनते. बाळूची खेडूत मानसिकता आणि त्याला दिसणारे आक्राळ विक्राळ शहर यांच्यातील टकराव हा एक सार्वत्रिक अनुभव आहे. त्यामुळे खेड्यापाड्यातील अनेक मुलांना ही कथा त्यांचीच वाटते. डॉ.किरण गुरव यांचा लेखनप्रवास कथालेख-नांकडून कादंबरी लेखनाकडे होताना दिसतो. मागील तीस वर्षापासून आपल्या-कडील गाव परिसराचा चेहरा मोहरा बदलू लागला. नवशिक्षित तरुणांच्या बेरोजगारीने गावातील वातावरण गुंतागुंतीचे बनू लागले. किरण गुरव यांनी याच बदलाला आपल्या लेखनाचे आशयसूत्रे बनविली. त्यांच्या कथा-कादंबरीतून जागतिकी-करणाच्या दाबातून आकाराला आलेल्या जगाचे संदर्भ आहेत. गावपरिसरातील तपशिल ते अपारंपारिक पध्दतीने आपल्या लेखनातून रचतात.

## संजय वाघ

संजय वाघ यांना साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार जाहिर झाला आहे. त्यांच्या 'जोकर बनला किंगमेकर' या किशोर कादंबरीसाठी तो पुरस्कार दिला गेला आहे. ते नाशिकचे पत्रकार आणि साहित्यिक आहेत. दरवर्षी जाहिर होणाऱ्या 'साहित्य अकादमीच्या' पुरस्कारातून नाशिकच्या वाट्याला आलेला साहित्य अकादमीचा बाल साहित्यातील हा पहिला पुरस्कार आहे. वाघ यांना मोबाईलमध्ये गडलेली एकलकोंडी झालेली बालके त्यांना खेळण्यास सोबत कोणीही नाही. बोलण्यास कोणी नाही. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास हरवला आहे. बालकाच्या हाती त्याचा आत्मविश्वास वाढवणारे बाळ साहित्य दिले पाहिजे. त्यांच्या डोळ्यात स्वप्ने पेरली पाहिजेत. असे त्यांचे म्हणणे आहे. 'जोकर बनला किंगमेकर' या किशोर कादंबरीचा जन्म तशाच विचारातून झाला आहे.

वाघ यांची भूमिका साहित्यनिर्मितीतून मिळणारा आनंद स्वतः सोबत इतरांनाही वाटता यावा अशी आहे. संजय वाघ यांची लेखणी समाजाला दिशा देण्यासाठी, त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी वर्तमानपत्रातून मुख्यतः झिजवली आहे. ते पत्रकार म्हणून परखड रोखठोक आहेत मात्र ते साहित्यलेखन करताना मेणाहून मऊ होतात. वाघ विशेषतः बालकांच्या भावविश्वाशी एकरूप होतात. त्यातूनच त्यांच्या 'गावं मामाचं हरवलं' आणि 'बेडकाची फजीती' या बाल कविता संग्रहाचा जन्म झाला. बदलेली कुटुंब रचना, विभक्त कुटुंबपद्धती 'हम दो हमारे दो' असे चौकोनी कुटुंब यामुळे मायेचा ओलावा जिव्हाळा लोप पावत चालला आहे.

विज्ञान युगातील बालकांची कल्पना शक्ती अफाट आहे. त्यांच्या रचनांची झेप अतुलनीय आहे. त्यांच्याशी सुसंगत बाल साहित्य निर्मिती होणे गरजेचे आहे. बाल साहित्याकडे दुय्यम दर्जाचे वाङ्मय प्रकार म्हणून पाहिले जाते. पण लेखकाचा खरा कस बालसाहित्य लिहिताना लागतो. प्रौढ वयातील लेखकाने बाल मताशी एकरूप होणे. त्यांचे भावविश्व जाणून घेणे ही परकायांप्रवेशासारखी कठीण गोष्ट आहे. एकदा का ती साधली तर सकस–बाल साहित्य निर्मिती दुर नाही असे त्यांचे मत आहे. ते म्हणतात की, बालकांना केवळ उपदेशांचे डोस पाजण्याऐवजी त्यांचे मानसिक भरण–पोषण करणारे साहित्य त्यांना दिले गेले पाहिजे.

वाघ यांना पुस्तकरुपी पाहिले अपत्य जन्माला येण्यासाठी वयाची ३९ वर्षे वाट बघावी लागली. त्याचे पहिले पुस्तक मुंबईवरील दहशतवाद्यातील हल्ल्यात अठरा शहीदांची शौर्यगाथा मांडणारे २६/११ चे अमर हुतात्मे हे नोव्हेंबर २००९ मध्ये प्रसिद्ध झाले. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस याच्या प्रस्तावनाचे संपादन केलेले डॉ.श्रीपाल सबनीस प्रणीत प्रतिभा संगम हे वाघ यांनी संपादित केलेले दुसरे पुस्तक. 'गंध माणसाचा' 'ऊन सावल्या' ही व्यक्ती–चित्रणात्मक अशी चार पुस्तके ही त्यांची इतर ग्रंथ संपदा आहे.

'जोकर बनला किंगमेकर' या किशोर कादंबरीची पहिली आवृत्ती चपराक प्रकाशनाने प्रकाशित केली. दुसरी आवृत्ती वैशाली वाघ यांच्या प्राजक्ता प्रकाशनाने देखण्या रूपात वाचकासमोर आणली. त्या कादंबरीला महाराष्ट्रातील मानाचे आणि काही महत्त्वाचे पुरस्कार लाभले आहेत. त्यात सार्वजनिक वाचनालय (नाशिक), सुर्योदय साहित्य पुरस्कार (जळगाव), दीन मित्रकार मुकुंद पाटील, स्वर्गीय माणिकराव जाधव उत्कृष्ट साहित्य निर्मिती यांचा समावेश आहे. तसेच त्यांना सावाना बालभवनाच्या वाचु आनंदे प्रकल्प अंतर्गत राज्यस्तरीय उत्कृष्ट बालसाहित्यिक पुरस्कारही मिळाला आहे. जोकर बनला किंगमेकर निर्मिती आणि विश्लेषण हा या कादंबरीला समीक्षा ग्रंथ समीक्षक दिवंगत राहुल पाटील यांनी संपादीत केला आहे. कादंबरीच्या वाट्याला महत्त्वाचे पुरस्कार वाचकांचे प्रेम आणि समीक्षकांनी घेतलेली दखल जसे चौफेर कौतुक लाभले आहे. साहित्य अकादमीने त्यात मानाचा तुरा रोवला आहे.

संजय यांना वडील रामदास वाघ यांच्याकडून समाजसेवा पत्रकारिता वाचन आणि लेखन असा समृद्ध वारसा लाभला आहे.

❖❖❖



# माझे प्रवासवर्णन

– संकेत कणसे
बी.ए.भाग २

अग्रणी महाविद्यालय अंतर्गत भिलवडी येथे 'ताणतणाव व व्यवस्थापन' या विषयावर कार्यशाळा घेतली जाणार होती. मी संतोष, अक्षय आणि महेश असे चौघेजण कार्यशाळेसाठी निघालो. आमच्या टीम चे सर आम्हाला आमणापूर येथे जॉईन होणार होते. आम्ही टू व्हीलर वरून रवाना झालो. रस्ता माहित नसल्याने गुगल मॅप लावला. गाडी सुसाट वेगाने पळवत होतो. वाऱ्याचा वेग प्राप्त झाला होता. तेवढ्यात अचानक महेश ने ब्रेक मारला. त्याला विचारलं, 'काय झालं रे' तो म्हणाला कुत्र्याचे पिल्लू आहे. कोणाच्या तरी गाडीखाली येऊन मरेल. त्याला पकड व समोरच्या रानात सोडून ये. मला पाहून ते कुत्र्याचं पिल्लू झुडपात शिरलं. त्याला पकडून समोरच्या रानात सोडून आलो. परत गाडीने वेढा पकडला. आम्ही पलूसमध्ये पोहोचलो. पलूसमध्ये गर्दी जास्त होती. चौकशी केली तर पलूसला यात्रा असल्याचे कळले. आम्ही गाडी साईडला लावली आणि यात्रेत शिरलो.

यात्रेत सगळीकडे आकर्षक वेगवेगळी स्टॉल लावले होते. स्टेशनरी, खेळणी, मेवा मिठाई, लेडिज शॉपी आम्ही यात्रेत धमाल केली. पिपानी घेऊन भोंगा वाजवत आनंद घेतला. आणि पुढे कार्यशाळेसाठी रवाना झालो. आम्ही पुढे औदूंबरच्या दिशेने निघालो. औदूंबरात पोह्चलो. दत्ताचे दर्शन घ्यायचे ठरले. कार्यशाळेसाठी उशीर झाला होता. म्हणून आम्ही घाई–गडबडीत दर्शन घेतले. पण दत्ताचे ते मंदिर. समोर कृष्णामाई डोळ्यासमोरून जाईना. मग मी मित्रांना म्हणालो, ''आपण जाताना या ठिकाणी परत येऊ या.'' असे ठरवून आम्ही कार्यशाळेच्या दिशेने निघालो रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता हेच कळत नव्हते. कसरत करीत करीत गाडी पुढे–पुढे जात होती. आणि आम्ही कार्यशाळेसाठी कॉलेजवर पोहजलो.

कॉलेजवर पोहोचलो. नाव नोंद केले. तोपर्यंत कार्यशाळा सुरू झाली होती. आम्ही सर्वजण कार्यशाळेच्या ठिकाणी जाऊन बसलो. विषय तज्ञानी मानवी ताणतणाव व व्यवस्थापन यावर छान माहिती सांगितली. स्वत:चा ताण–तणाव कसा दूर करायचा आणि ताण–तणाव म्हणजे नेमके काय. हे उत्तम रित्या सांगितले. कार्यशाळेचा समारोप झाला. कडकडून भूक लागली होती. खाली असणाऱ्या व्हॉलमध्ये जेवणाची व्यवस्था केली होती. आम्ही चौघेजण मस्तपैकी चापून ताव मारला. जेवण झाले. प्रवास भत्ता घेऊन परतीच्या प्रवासाला निघालो.

औदूंबर डोळ्यांसमोरून हालन नव्हते. संत वाहणारी कृष्णामाई आम्हाला बोलवत होती. आणि ठरल्याप्रमाणे आम्ही औदूंबरला गेलो. निसर्गाची झालर पांघरलेलं ते तिर्थक्षेत्र दत्ताच्या पदस्पर्शानी पावन झाले होते. भव्य कमानीतून आम्ही आत प्रवेश केला. उन्हामुळे घशाला कोरड पडली होती. समोरचा निसर्ग आणि गारवा मनाला स्पर्श करून गेला. मग मन शांत झाले. हिरवी गर्द वनराई विविधतेने नटलेली होती. उंचच्या उंच आकाशाशी स्पर्धा करणारी वृक्ष पाहून आनंद गगनात मावेनासा झाला. शांत वाहणारी कृष्णामाई झाडाच्या सावलीमुळे अधिकच सुंदर दिसत होती. कृष्णामाईचा स्पर्श करून गार पाण्यात पाय

बुडवून आम्ही घाटावर शांत बसलो. त्या क्षणाला आम्हाला दुसऱ्या कशाचीही आठवण झाली नाही. मंदिरात प्रवेश करून श्री गुरुदेव दत्ताचे दर्शन घेतले. ते दत्ताचे मनमोहन रूप पाहून नामस्मरणामध्ये तल्लीन झालो. मोबाईलवर फोटो काढण्याची तीव्र इच्छा होती. दत्तांच्या पादुकांना मुखवटा लावला होता. पादुका केसरी भंडाऱ्यात अधिकच मनमोहन दिसत होत्या. मंदिराच्या गाभाऱ्यामध्ये शांतता होती. सर्व दुःख विसरून गेले होते. सगळीकडे चित्ताची शांतता पसरली होती. मंदिराला प्रदक्षिणा घातली होती. जवळच औंदुबराचे झाड होते. औदूंबराला (उंबराला) प्रदक्षणा घातली. त्या औदूंबराच्या झाडाला कुंपण घातलं होतं. ते उंबराचं झाड श्री दत्तांना प्रिय होत असं म्हणतात. त्या उंबराच्या झाडामध्येच श्री दत्ताचा वास आहे, असे म्हणतात. आम्ही त्याचे दर्शन घेतले, कपाळी केशरी गंध लावला. तसेच पुढे गेलो. तेथे एक पार होता. पार म्हणजे झाडाच्या भोवती बांधकाम करून फरशी बसविली होती. त्यावर एक काचेचा गाभारा तयार करून त्यामध्ये पादूका ठेवलेल्या होत्या. तसेच पुढे आणखी एक गाभारा होता असे त्या परिसरात अनेक गाभारे होते. एकात दत्ताची मुर्ती, त्याच्यापुढे गणपतीची, त्याच्यापुढे महादेवाची पिंड, त्याच्यापुढे नामदेवाची मुर्ती, त्याच्यापुढे हनुमानाची मुर्ती, आम्ही या सर्व देवांचे दर्शन घेतले. बाजूलाच महाप्रसाद चालू होता. कॉलेजमध्येच भरपेट खाल्यामुळे आम्ही महाप्रसादाचा मोह टाळला. तसेच सरळ पुढे जाऊन आम्ही त्या झाडांच्या सावलीत विसावलो. बरेच फोटो काढले. समोरच कृष्णामाईमध्ये तरुण मुले पोहत होते. आम्हीही पाण्यात उतरून पाणी खेळलो. पाय धुतले. तोंडावर पाणी मारून माघारी फिरलो. सायंकाळ होत होती. सर्वजण आपआपल्या घरी जाण्याच्या तयारीत होते. आम्ही मंदिराच्या बाहेर पडलो. जातांना श्री दत्ताचा प्रसाद म्हणून मेवा मिठाई घेतली. मोठ्या चिंचेच्या झाडाखाली गाडी लावली होती. गाड्या काढल्या आणि आम्ही घरच्या दिशेने परतीच्या प्रवासाला लागलो. मागे वळून पाहण्याचा मोह झाला. मागे वळून पाहिले. आमची गाडी पुढे-पुढे जात होती. मनात मात्र ते नदिकाटाचं तीर्थक्षेत्र औदुंबर, हिरवी वनराई आणि शांत वाहणारी कृष्णामाई पुन्हा पुन्हा मनात पिंगा घालत होती.

❖❖❖




# पाणी जीवनाचे अमृत

पाणी हे जीवनाचे अमृत आहे
नको मानवा करु त्याची नासाडी
नदी पात्रात टाकूनी केरकचरा
प्रदुषित करीशी तु त्या पाण्याला
थेंबे थेंबे तळे साचे या म्हणीचा
अर्थ आपल्या जीवनात आचरशी
पाण्याचा टाळूनी अपव्यय
जल संवर्धन करीशी या पाण्याचा
पाणी हे जीवनाचे अमृत आहे
नको मानवा करु त्याची नासाडी
जल संकट येता
भटकंती होई या पाण्यासाठी
पशुपक्षी व्याकुळ होती
याच पाण्यासाठी
पण्याचे जतन करणे
हीच काळाची गरज
पाणी हे जीवनाचे अमृत आहे
नको मानवा करू त्याची नासाडी

– प्रसाद चव्हाण
बी.ए.भाग १



# महात्मा गांधी - एक विचार

- कु. मेघना भंडारे
बी.ए.भाग २

गांधीजी म्हटलं की, सत्य अहिंसा व सत्याग्रह हेच शब्द आठवतात. संस्कृत भाषेत महात्मा अथवा महान आत्मा एक सन्मान संयुक्त शब्द आहे. १९१५ मध्ये राजवैध जीवनात कालिदास ने या सन्मान सुचक शब्दाने गांधीजींचा उल्लेख केला. बापूजी ह्या शब्दाचा गुजरात भाषेतील अर्थ वडिल किंवा पिता असा होतो.

अहिंसा म्हणजे अपार प्रेम व ते व्यक्त होण्याचे साधन म्हणजे जनसेवा होय. गांधीजींना राष्ट्रपिता म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीच ६ जुलै १९४४ ला रंगून रेडिओ प्रसारनामध्ये संबोधले होते. तसेच सुभाषचंद्र बोस यांना प्रथम नेताजी म्हणणारे गांधीजीच होते. गांधीजींचे राष्ट्रपिता हे कोणाच्या मानण्या न मानण्यावर अवलंबून नाही आणि कोणाच्या मेहरबानीने ते महात्माजींना मिळालेले नव्हते. गांधीनी राष्ट्रही जागविले आणि नवा राष्ट्रवादही जागविला म्हणूनच सर्वबाबतीत विभिन्नता असलेल्या देशात सर्वांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक समतेच्या संधी देणाऱ्या एका आधुनिक राष्ट्राची निर्मिती शक्य झाली. त्यामुळे गांधीजी राष्ट्रपिता ठरतात.

विसाव्या शतकात खरे पाहता जगावर मोठा उपकार झालेला दिसतो कारण याच काळामध्ये चार क्रांतिकारक विचारवंत लेनिन, माओ त्से तुंग, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर होऊन गेले. या विचारवंतांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विचारांचा जगावर प्रभाव पडला.

आज सगळीकडे बोकाळलेला दहशतवाद, भ्रष्टाचार, हिंसाचार, सामान्य माणसांची पिळवणूक, शिक्षणाचा बाजार, चारित्र्यहीन राजकारण अशा भयावह वातावरणात माणूस शांतीच्या शोधात आहे. विश्वामध्ये शांतीचा मार्ग दाखविणाऱ्या म. गांधीचे स्मरण सतत भारताला नव्हे तर संपूर्ण जगाला होते आहे. त्यांच्या विचारांकडे पुन्हा डोळसपणे पहाण्याची गरज आहे. शांततेच्या व वाटाघाटीच्या मार्गाने सर्व प्रकारचे प्रश्न मार्गी लागू शकतात हे अहिंसा या तत्वाचे सामर्थ्य आहे.

वाढलेली संपत्ती, लालसा, सत्तेची लालसा यामुळे गेल्या सत्तर वर्षात भारतीय जनता आपल्या मार्गापासून आज खूप दुर गेलेली आहे. लोकशाही, समाजवाद हे शब्द फक्त पुस्तकात शोभून दिसतात. भाषणात टाळ्या मिळविण्यासाठी त्यांचा उपयोग होतो. गांधीजी या साऱ्या संकल्पना जगले आणि नंतरच त्यांनी जगाला सांगितले मात्र आज असे होताना दिसत नाही.

गांधीजी म्हणायचे मनोनिग्रह महत्वाचा, मनावर नियंत्रण हे सर्वात मोठे बंधन. मात्र मनाचे तर सोडाच कायद्याचे बंधनही पाळले जात नाही. आज घडीला सर्रास कायदा पायदळी तुडवला जातो. तो श्रीमंतासाठी वेगळा असतो गरिबांसाठी वेगळा असतो.

गांधीजींच्या शिकवणीतली 'बुरा मत देखो, बुरा मत कहो, बुरा मत सुनो' ही तिन्ही आकडे आमच्या आसपास असहाय्य होऊन वावरत असतात.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या, सलग पडणारा दुष्काळ पाहिल्यावर गांधीजींचे 'खेड्याकडे चला' हे

वाक्य आठवते. खेड्याकडे चला म्हणजे तिथला विकास करा. त्या माणसांना आपल्यात आणा इंडिया आणि भारत हा भेद मिटवा असे त्यांना म्हणायचे होते. मात्र आजही आम्ही ते करू शकलो नाही.

आज माणूस धर्मात, जातीत, पंथात वाटला गेला आहे. आपण जितके जास्त सुशिक्षित आपल्या भावनाही तितक्याच जास्त संकुचित होत चालल्या आहेत. असे वारंवार वाटते आहे. गांधीजी म्हणायचे, माणसातील आपुलकी प्रकट करणारा तो खरा धर्म. उच्च निच भाव निर्माण होत असेल तर त्या धर्माला मी धर्म मानणार नाही. जोपर्यंत मानवजातीत ऐक्याच्या भावनेला महत्व दिले जात नाही तोपर्यंत प्रार्थना, उपवास, जपतप निरर्थक आहेत. भारतात हिंदूच नाहीत तर मुस्लीम, पारसी, ख्रिश्चन आणि इतर धर्माचे लोकही राहतात. भारत हा फक्त हिंदूंची भूमी आहे हे हिंदूंचे गृहितक चुकीचे आहे. अशा विचारांमुळेच गांधीजी आजही काळसुसंगत ठरतात.

सक्तीचे व मोफत शिक्षण ही त्यांचीच संकल्पना. मातृभाषेतून शिक्षण द्यावे, यावरच त्यांचा भर होता. केवळ साक्षर होणे म्हणजे शिक्षण नव्हे तर ज्या शिक्षणामुळे स्वावलंबन निर्माण होते. आपला सर्वांगीण विकास होतो ते खरे शिक्षण असे ते म्हणत.

पुस्तकाच्या चौकटीतले शिक्षण त्यांना मान्य नव्हते. कृतीतून शिकावे असे ते म्हणत. त्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. बापूंजीनी 3H ही शैक्षणिक कल्पना मांडली. त्यात Heart, Head and Hand यांचा समावेश होते. या तिन्ही बाबी एकत्र येऊन जो विकास तोच व्यक्तीचा आणि राष्ट्राचा विकास असे ते म्हणत. त्यांचे हे शिक्षण विषयक विचार आजच्या काळात सुसंगत आहेत असे नव्हे तर कितीतरी पुढचा विचार करणारे आहेत.

स्वदेशी वस्तू वापरणे त्यातून रोजगार निर्माण होणे आणि त्यातूनच राष्ट्राची आर्थिक उन्नती होणे इतके साधे त्यांचे गणित. याच जोरावर चीनने आज जगभर बाजी मारली. यावरून गांधीजींचे शिक्षण आणि रोजगाराचे विचार काळाशी किती सुसंगत होते याची जाणीव होते.

❖❖❖

## कॉलेज

कॉलेज माझ्या मनासारखे
गुलाबाच्या फुलासारखे
या फुलात मुले बागडतात
फुलपाखरांसारखे....
वाहतो वास प्रेमाचा
गंध येतो भावनेचा
रंग जुळतात मनाचे
पडतो पाऊस ज्ञानाचा
झरा वाहतो कलेचा
कळतं....गणित आयुष्याचं
कॉलेज माझ्या मनासारखे
न कोमेजणाऱ्या फुलांसारखं....



– शुभम कुंभार
बी.ए.भाग १

## कोणाला काय द्यावे?

वेळेला महत्व द्या
संकटाला तोंड द्या
बुडत्याला आधार द्या
घाबरणाऱ्याला धीर द्या
आई–वडिलांना सुख द्या
गुरुजनांना मान द्या
मित्रांना स्नेह द्या
जीवनाला गती द्या
देशाला सर्वस्व द्या

– कु. गौरी महापुरे
बी.ए.भाग १




# भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

(वैचारिक लेख)

– अक्षय फुके
बी.ए.भाग २

''एकच तारा समोर, आणिक पायतळी अंगार
गर्जा जय जयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार !''

कवी कुसुमाग्रज यांनी केलेल्या या आवाहनाचे सार्थक होण्यास १५ ऑगस्ट १९४७ चा दिवस उजाडला. पिंजऱ्यातून पक्षी उडाला, स्वातंत्र्याची रम्य प्रभात झाली. असंख्य बलिदानाचे सार्थक झाले. आणि भारताला पारतंत्र्यातून मुक्तता मिळून स्वातंत्र्य मिळाले. बघता–बघता स्वातंत्र्याचा प्रवास ७५ वर्षाचा होत आहे. आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. एखाद्या राष्ट्राच्या जीवनात ७५ वर्षाचा कालखंड हा जरी फार मोठा टप्पा नसला तरी राष्ट्रातील नागरिकांच्या जीवनात स्वातंत्र्याची ७५ वर्ष पूर्ण करणे अनन्यसाधारण महत्वाचे आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपली स्वातंत्र्याविषयी कोणती स्वप्ने होती? स्वातंत्र्याकडून आपल्या कोणत्या अपेक्षा होत्या? आज सत्य काय आहे? कुठे होतो आपण आणि आता कुठे आहोत? उणिवा काय राहिल्या आणि आता भविष्यात कशी पावले उचलावी लागतील.? याचा विचार आपल्याला करायला लागेल. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपण काय कमावलं आणि काय गमावलं? याचे सिंहावलोकन करण्याच्या टप्प्यावर आपण येऊन पोहोचलो आहोत. भारत हा नैसर्गिक साधनसंपत्ती आणि खनिज समृध्द देश आहे. माथी हिमालय उभा आहे. पायी सागराच्या लाटा लोळण घालत आहेत. देशातून गंगा–गोदावरी, ब्रम्हपुत्रा सारख्या रक्त वाहिन्या वाहत आहेत. सजीव पक्षी आकाशी भरारी मारतो आहे. सैनिक आणि जवान डोळ्यात तेल घालून देशाची सीमा रक्षण करतात. किसान लोकराजा बनला आहे. आपल्या देशाला शिमला, कुलू, मनाली, उटी सारखी समृद्ध पर्यटन स्थळे लाभली आहेत, एकूणच आपला भारत देश ''सुजलाम, सुफलाम'' आहे.

आपल्या देशाला पौराणिक आणि ऐतिहासिक संस्कृतीचा वारसा लाभला आहे. अनेक जाती, धर्माचे, भाषांचे लोक येथे गुण्या गोविंदाने एकत्र नांदत आहेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर यांच्यासारख्या थोर संतांची भूमी असलेल्या आपल्या देशाची संस्कृती मानली जाते. भारत एकाच वेळी अध्यात्मात आणि विज्ञानातही अग्रेसर होत आहे. अनेक खेळ प्रकारात भारताने जागतिक दर्जाची कामगिरी केली आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात गेली ७५ वर्ष साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती या क्षेत्रामध्ये नामवंत लेखक साहित्यिक व कलावंतांनी आपला अवीट ठसा उमटवला आहे.

पण असे असले तरी एकीकडे प्रगती होते आणि दुसरीकडे अनेक गोष्टी आपल्याला वेदना देत आहेत. स्वातंत्र्यासाठी अनेक शूर वीरांनी आयत्या–वेळी तारुण्यात बलिदान दिले. आपले संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्यासाठी खर्च केले. स्वातंत्र्यासाठी त्यांनी रक्ताचा सडा सांडला. पण आम्ही मात्र रक्ताचा घाऊक बाजार मांडला. असं कधीकधी उगाचच वाटते. आज चीन–पाकिस्तानसारख्या परकीय शक्ती सीमेवर आक्रमणाच्या तयारीत असतात.

देशांमध्ये दहशतवादी हल्ले होतात. उरी, पुलवामा सारख्या रक्ताळलेल्या आठवणी आपल्याला दुःख देतात या देशातल्या शेतकऱ्याला आपल्या हक्कांसाठी आंदोलन करावे लागते. अनेक गरिबांना एक वेळचे जेवणसुद्धा मिळत नाही. स्वर्गासारखा काश्मीर गुलाबाच्या सुगंधाने दरवळत रहाण्याऐवजी रक्तात रंगताना पहायला मिळतो. धर्माच्या नावावरून जातीय दंगली होतात. तेव्हा स्वातंत्र्याच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या उडतात. भारत मातेच्या हृदयाचे शेकडो तुकडे होतात. एकाच आईची लेकरे एकमेकांच्या रक्तासाठी तहानलेली असतील तर... त्या आईची काय अवस्था होत असेल? या साऱ्या आक्रमणांमध्ये अतिशय सामान्य माणूस भरडला जातो. जळणारी झोपडी आणि करपणारे रक्त मात्र भारतीयच आहे.... हे आपण का विसरतो? हा खरा प्रश्न आहे.

भ्रष्टाचाररुपी यंत्रणेमुळे मोठी व्यवस्था पोखरली जाते. रोज मोठ्या अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक होते, तेव्हा ज्याच्या हाती आपण देशाची प्रशासन व्यवस्था सोपवली आहे... तेच भ्रष्टाचाराने बरबटलेले पाहून असंख्य वेदना होतात. तुरुंगात असताना अनेक गुन्हेगार निवडणुका जिंकतात. दरवर्षी मोठमोठे घोटाळे उघडकीस येतात. सामान्य माणसाच्या हक्काची भाकरी गिळंकृत करणारी मंडळी या देशाचे मारेकरी आहेत. सत्यमेव जयते, हे ब्रीदवाक्य आपल्या देशाची शान आहे. परंतु अशा दृष्ट प्रवृत्तीमुळे देश शोकग्रस्त होतो. कधीकधी देशासाठी फासावर चढणारे तरुण, अवघ्या चौदाव्या वर्षी शरीरावर गोळी झेलणारे शिरीष कुमार सारखे तरुण पाहिले तर आजच्या या तरुण पिढीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ त्यांना कधी कळेल का? असा प्रश्न पडतो.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपल्याला एक गोष्ट मान्यच करावी लागेल की-भारतीय स्वातंत्र्याने आपल्याला खूप काही दिले आहे. परंतु जो असमाधानाचा असंतोषाचा सूर निघत आहे त्याला आपणच जबाबदार आहोत. आपली आर्थिक सांस्कृतिक, औद्योगिक प्रगती झाली पण मुल्यांचा ऱ्हास होत गेला. म्हणूनच एकीकडे आपण वैज्ञानिक प्रगतीच्या मार्गाने झपाट्याने परिवर्तन करीत आहोत परंतु त्याच वेळी दुसऱ्या बाजूने वेगाने वाढणाऱ्या भैतिक व अभौतिक समस्यांच्या दृष्ट विळख्यात आपण आढळल्याने स्वातंत्र्याचा श्वास गुदमरतोय अशी अवस्था झाली आहे. म्हणूनच स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशातील जनतेला एवढेच आव्हान करता येईल....

❖❖❖

---

## एखादाच असतो...

काजव्याप्रमाणे चमकणारे तर भरपूर असतात.
पण, सुर्यासारखा तेजस्वी एखादाच असतो.
ताऱ्याप्रमाणे लुकलुकणारे तर भरपूर असतात.
पण, चंद्रासारखा उजळ एकादाच असतो.
घारीप्रमाणे घिरट्या मारणारे तर भरपूर असतात.
पण, गरुडाप्रमाणे उंच भरारी घेणारा एखादाच असतो.
अर्जुनासारखे धनुर्धारी तर भरपूर असतात.
पण एकलव्यासारखा एकनिष्ठ एखादाच असतो.
काचेप्रमाणे उन्हात चमकणारे तर भरपूर असतात.
पण हिऱ्यासारखा अंधारात चमकणारा एखादाच असतो.
झऱ्यांप्रमाणे खळखळणारे तर भरपूर असतात.
पण, समुद्राप्रमाणे शांत एखादाच असतो.
पर्वतासारखे उंच तर भरपूर असतात.
पण, आकाशासारखा असीम एखादाच असतो.
सदाफुलीसारखे फुलणारे तर भरपूर असतात.
पण, पारिजातकासारखा दरवळणारा एखादाच असतो.
राजा बलीप्रमाणे दान देणारे भरपूर असतात.
पण, कर्णासारखा दानशूर एखादाच असतो.
एखादाच असतो.

– कु.भारती राठोड
बी.ए.भाग ३



# जागतिक तापमान वाढ व हवामान बदल

(चिंतनपर लेख)

– संदिप मोहिते
बी.ए.भाग २
भूगोलशास्त्र विभाग

''जागतिक तापमान वाढ व हवामान बदल''
(Global Warming and Climate Change)

जागतिक तापमान वाढ म्हणजे वातावरण व भू-पृष्ठावरील हवेच्या तापमानामध्ये हळूहळू होणारी वाढ, हवेमध्ये त्या अनुषंगाने होणारे बदल होय. ते मानवाच्या हस्तक्षेपामुळे वातावरणातील वेगवेगळ्या स्तरांमध्ये होणाऱ्या बदलामुळे होतात. वातावर-णातील हरितगृह वायूंचे तापमान त्यांच्या सामान्य तापमानापेक्षा/जास्त झाले की, जागतिक तापमानवाढ होते. वातावरणातील हरितगृह वायूंचे तापमानामध्ये औद्योगिकरण शहरीकरण यामुळे, वाहन उद्योग, घरगुती व शेतीमधून उत्सर्जित होणाऱ्या प्रदूषणाने वाढ होते. हरितगृहाला वायुमध्ये मुख्यत: मिथेन, क्लोरोफ्लुरोकार्बन, नायट्रस ऑक्साईड व ओझोन यांचा समावेश होतो. जागतिक तापमानवृद्धीमुळे हवामानामध्ये बदल होतात, त्याचे पुरावे हवामान बदलासाठी, युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क ऑन क्लायमेट चेंज (UNFOCC) ह्यांच्या अधिपत्याखाली, युनायटेड नेशन्स एन्व्हायरमेंट प्रोग्राम (UNEP) व वर्ल्ड मेट्रोलॉजिकल ऑर्गनायझेशन (WNO) ह्यांनी स्थापित केलेल्या आंतरराष्ट्रीय समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये शास्त्रीय प्रमाणासह नमुद केले आहेत.

अनेक अहवालावरून दिसून आले आहे की, हिमालयातील हिमाच्छादल कमी झाले आहे. तसेच आल्प्स, अँडीज, रशियातील कॉकेशस, चीनमधील नियेनशान, आल्प्स पर्वतावरील हिमाचे आवरण कमी झाल्याचेही अहवाल प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे महासागरातील पाण्याचे तापमान वाढून आर्क्टिक व अंटार्क्टिका महासागरातील हिमाचे कवच कमी झाले आहे.

उदा.-हिंदी महासागरातील पाण्याचे तापमान वाढल्यामुळे प्रवाळ (कोरल) चे हिलचींग झाले व अंदमान निकोबार व लक्षदीप बेटाजवळचे जवळ जवळ ७% प्रवाळ नष्ट झाले. समुद्राच्या पाण्याचे सरासरी तापमान विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ०.६ से. ने. वाढले.

पृथ्वीच्या वातावरणातील ओझोनचा थर पृष्ठभागापासून सुमारे १२ कि.मी. x ३५ कि.मी.च्या पट्ट्यात असतात. हा पृथ्वीसाठी एक संरक्षक थर असून तो पृथ्वीसाठी हत्तीसारखे काम करतो, कारण सुर्यापासून येणारे अतिनिल किरण तो पृथ्वीपर्यंत पोहचवण्यापासून अडकाव करतो. म्हणून पृथ्वी-भोवती ओझोनचा थर असणे हे सर्व प्रकारच्या सजीवासाठी म्हणजे मानव, प्राणी व वनस्पतीसाठी महत्वाचे असते त्या थराच्या अनुपस्थितीत कोणताही सजीव जीवंत राहू शकत नाही कारण सुर्यापासून निघालेले अतिनील किरण पृथ्वीवरच्या वातावरणात व जमिनीपर्यंत पोहचतील व परिणामी पृथ्वीचे वातावरण व पृष्ठभागाचे तापमान इतके वाढेल की पृथ्वीचे एका पट्टीत रुपांतर व्हायला वेळ लागणार नाही. अशा या ओझोनच्या थराचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे. हरितगृह हे काचेपासून बनवलेले एक दालन असते. ज्यामध्ये कृत्रिमरित्या वनस्पतींच्या वाढीचे वातावरण तयार करून त्यांची

वाढ केली जाते. फ्रेंच शास्त्रज्ञ जोसेफ फोरियन नावाच्या शास्त्रज्ञानी एका काचेच्या भांड्यामध्ये पृथ्वीच्या वातावरणाचे निरिक्षण केले तेव्हा त्यास असे दिसून आले की पृथ्वीभोवती असणारे वातावरण एखाद्या काचेच्या छताप्रमाणे पृथ्वीचे सूर्य किरणापासून संरक्षण करते.

जागतिक तापमानवाढ म्हणजे सुर्य किरणामध्ये असलेल्या अतीनील किरणांचे, हरितगृहवायूंचे प्रमाण जास्त होण्यामुळे, अधिक प्रमाणात वातावरणामध्ये मिसळणे, ज्यामुळे पृथ्वीच्या वातावरणाचे सरासरी तापमान वाढते. हरितगृह वायुमध्ये जे हरितगृहवायुच्या परिमाणमाय कारणीभूत असतात. $CO_2$ वायु मोठ्या प्रमाणात, मिथेन व क्लोरोफ्युसोकार्बन (CFC) जास्त प्रमाणात कार्बन शोषून घेण्याची क्षमता असते. नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर हे वसा 'क्लुओराईड व पाण्याची वाफ इ. घटक असतात. हे हरितगृह वायु, पृथ्वीभोवती एखाद्या ब्लँकेटप्रमाणे लपेटलेले असतात. जरी ह्या वायुंचा अतिरेक पर्यावरणासाठी घातक असतो तरी जर हे वायू वातावरणात नसते तर पृथ्वीचे तापमान १८ ते १९ से. असते. वातावरणात उत्सर्जिक होणाऱ्या हरितगृह वायुमध्ये $Co_2$ व CH4 चे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ९०% असते. वाढते निर्बनीकरण, खनिजतेलांचा वाढता वापर, वाहनापासून होणारे उत्सर्जन व इतर औद्योगिक कारणांमुळे विशेषत: $CO_2$ वायूचे वातावरणामधील प्रमाण अतिशय वाढले आहे. ज्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढले आहे. आज जागतिक तापमानामध्ये अधिक तीव्रतेने वाढ होत आहे. आज जागतिक तापमान १४.४ से. पर्यंत वाढले आहे. $CO_2$ वायू व इतर हरितगृह वायुंचे प्रमाण अशाच प्रकारे वाढत राहिले तर २१ व्या शतकाच्या अखेरपर्यंत, पृथ्वी हा ग्रह राहण्यास योग्य राहणार नाही.

पृथ्वी ह्या आपल्या एकुलत्या एका ग्रहाला वसुंधरेला वाचवणे हे आजचे मुख्य उदिष्ट आहे त्यासाठी पर्यावरण संरक्षणाबरोबरच शाश्वत विकासासाठी पृथ्वीचे संरक्षण करणे काळाची गरज आहे. यासाठी वृक्ष लागवड पाणथळ प्रदेशांचे पुनरुज्जीवन, शाश्वत शेती, सेंद्रिय घटकांचीनिर्मिती यासारख्या गोष्टी आपल्याला करता येतील. त्याचबरोबर भू-अभियांत्रिकी(Geo-Engineering) या तंत्रज्ञानांचा वापर आज मोठ्या प्रमाणात तापमान बदलावर नियंत्रण मिळवण्यासाठी करता येतो. या प्रणालीद्वारे कर्बावर ताबा मिळवून सौर उत्सर्जनाचे व्यवस्थापन करता येते. सौर उत्सर्जनाचे व्यवस्थापन तंत्रामध्ये सल्फर डायऑक्साइड वातावरणामध्ये फवारणे, अवकाशामध्ये मोठे आरसे बसविणे, घराची छप्परे व इतर गोष्टी फिकट रंगाची करणे ज्याने पृथ्वीची परिवर्तन क्षमता किंवा धवलता (Albedo) वाढविता येते. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय स्तरापासून व स्थानिक पातळीवर वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जातात. उदा. पहिली जागतिक परिषद किंवा संयुक्त राष्ट्र संघाची पर्यावरण व विकास परिषद १९९२ या परिषदेला रिओ परिषद असेही म्हटले आहे. क्याटो करार कार्बन ट्रेडिंग व कोपेनहेगन परिषद ही पहिलीच हवामान विषयक परिषद होती. त्याचबरोबर भारतातसुद्धा हवामान बदलावर राज्य कृती आराखडा तयार झाला. त्याचबरोबर राष्ट्रीय सौर मिशन, राष्ट्रीय जलमिशन, हिमालयीन पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी, हरीत भारतासाठी आणि शाश्वत शेतीसाठी राष्ट्रीय मिशन अशा विविध योजनांच्या माध्यमातूनसुद्धा भारताने जगात आपला सहभाग नोंदवला आहे. त्याचबरोबर "COP-21 इंडिया पॅव्हिलियन' यामध्ये हवामान बदलावर भारताने केलेल्या कार्याचा आढावा घेतला आहे. भारताच्या पंतप्रधानांनी पॅरिसमध्ये ह्या पॅव्हिलियनचे उद्घाटन "COP-21 मध्ये दे पॅव्हिलियन, जल पडदा, ३६० फिल्म, आयपॅड, भारताच्या संस्कृतीचे व 'शाश्वत विकासाचे वनई बुक' त्यामुळे एक आकर्षणाचे केंद्र होते.

❖❖❖



# आभासी चलन

- कु. फिजा पटेल
बी.ए.भाग २

जगातील कोणतीही व्यक्ती, संस्था आणि देश यांना त्यांच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आणि परस्पर व्यवहारांना चालना देण्यासाठी चलन (करन्सी) आवश्यक आहे. जेणेकरून त्यांना त्याचा वापर सुरळीतपणे करता येईल. म्हणून प्रत्येक देशाचे स्वत:चे चलन आहे, जसे की भारतातील रुपया, अमेरिकेतील डॉलर इ.वास्तविक हे भौतिक चलन आहे जे तुम्ही कोणत्याही ठिकाणी किंवा देशाच्या नियमानुसार पाहू शकता, स्पर्श करू शकता आणि वापरू शकता. परंतु क्रिप्टो चलन त्याहून वेगळे आहे हे डिजिटल चलन आहे. तुम्ही ते पाहू किंवा स्पर्श करू शकत नाही, कारण क्रिप्टो चलन भौतिक स्वरूपात छापलेले नाही. म्हणूनच त्याला आभासी चलन म्हणतात. गेल्या काही वर्षात हे चलन खूप लोकप्रिय झाले आहे.

*** क्रिप्टो करन्सी म्हणजे काय?**

क्रिप्टो करन्सी हे चलन आहे जे संगणकाच्या अल्गोरिदमवर तयार केले जाते. हे मालक नसलेले एक विनामूल्य चलन आहे. हे चलन कोणत्याही एका प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली नाही. सहसा, रुपया, डॉलर, युरो किवा इतर चलनांप्रमाणे, हे चलन कोणत्याही राज्य, देश, संस्था किंवा सरकारद्वारे चालवले जात नाही. हे एक डिजिटल चलन आहे. ज्यासाठी क्रिप्टोग्राफी वापरली जाते. साधारणपणे कोणत्याही वस्तू खरेदी करण्यासाठी किंवा सेवा खरेदी करण्यासाठी याचा वापर केला जाऊ शकतो.

तुम्हाला हे माहित असले पाहिजे की २००९ मध्ये पहिली क्रिप्टोकरन्सी सादर केली गेली होती जी ''बिटकॉइन'' होती. ते जपानच्या संतोषी नाकमोतो नावाच्या अभियंत्याने बनवले होते. सुरुवातीला ते तितकेसेच लोकप्रिय नव्हते, परंतु हळूहळू त्याचे दर गगनाला भिडू लागले, त्यामुळे ते यशस्वी झाले.

Crypto currency ला Digital Currency असे देखील म्हटलं जातं. ही एका प्रकारे Digital Asset आहे ज्याचा वापर वस्तू खरेदी करण्यासाठी किंवा Services साठी केला जातो. हे एका Peer to peer Electronic System आहे. ज्याचा वापर Inernet च्या माध्यमातून regular Currencies ऐवजी Goods आणि Services Purchase करण्यासाठी करता येत. या प्रणालीमध्ये, सरकार बँकांना न कळवता काम करू शकते, त्यामुळे काही लोकांचा असा विश्वास आहे की क्रिप्टोकरन्सीचा वापर चुकीच्या मार्गाने देखील केला जाऊ शकतो. जर आपण प्रथम क्रिप्टोकरन्सी बद्दल बोलायला गेलो तर ते बिटकॉइन असेल जे या कामांसाठी जगात प्रथम आणले गेले. जर आपण आज पाहिले तर संपूर्ण जगात १000हून अधिक क्रिप्टोकरन्सी आहेत, परंतु त्यापैकी फक्त काही अधिक महत्वपूर्ण आहेत. क्रिप्टोकरन्सी तयार करण्यासाठी क्रिप्टोग्राफीचा वापर केला जातो.

**बिटकॉइन व्यतिरिक्त, इतर लोकप्रिय चलने कोणती आहेत?**

बिटकॉइन व्यतिरिक्त, इतर क्रिप्टोकरन्सी देखील बाजारात उपलब्ध आहेत ज्या आजकाल अधिक वापरल्या जात आहेत, जसे की लाल नाणे, रेड कॉइन,सिया कॉइन, व्हॉईस कॉईन आणि मोनेरो. आता त्यांच्याबद्दलच्या काही महत्त्वाच्या गोष्टी जाणून घेऊया.

**रेड कॉईन :-** बिटकॉईन व्यतिरिक्त इतर अनेक क्रिप्टोकरन्सी आहेत ज्या विशेष प्रसंगी वापरल्या जाऊ शकतात, त्यापैकी एक ''रेड कॉईन'' आहे. याचा उपयोग लोकांना टिप देण्यासाठी केला जातो.

**सिया कॉईन :-** सिया नाणे SC ने चिन्हांकित केले आहे. हे नाणे चांगले वाढत आहे. या नाण्याची किंमत आणखी वाढू शकते.

**SYS COIN (एसव्हाईएस कॉइन) :-** हे क्रांतिकारी क्रिप्टो चलन आहे जे शून्य खर्चाचे आणि अविश्वसनीय गतीने आर्थिक व्यवहार देते. व्यवसाय, मालमत्ता, डिजिटल प्रमाणपत्रे, डेटा सुरक्षितपणे व्यापार करण्यासाठी पायाभूत सुविधांना व्यवसाय प्रदान करतात. सिकोइन ब्लॉकचेनंबर कार्य करते जे बिटकॉइनचाच एक भाग आहे.

**व्हॉईस कॉईन :-**हे नवोदित संगीतकारांसाठी डिझाइन केलेले एक व्यासपीठ आहे. जिथे गायक त्यांच्या संगीताची किंमत स्वत: ठरवतात.ते संगीतांचे नमुना ट्रॅक विनामूल्य देऊ शकतात. शिवाय फ्लॅटफार्मवरील संगीत उत्साही आणि वापर-कर्त्यांकडून समर्थन देखील मिळू शकते. या व्यासपीठाचा मुख्य उद्देश स्वतंत्र कलाकारांची कमाई करणे हा आहे.

**मोनेरो :-** हे देखील एक प्रकारचे क्रिप्टो चलन आहे. ज्यामध्ये विशेष प्रकारची सुरक्षा वापरली जाते. याला रिंग सिग्नेचर असे म्हणतात. हे डार्क वेब आणि ब्लॉक मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. त्याच्या मदतीने तस्करी केली जाते. या चलनाचा काळाबाजार सहज करता येतो.

**Crypto Currency मध्ये गुंतवणूक कशी करावी?**

क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी, तुम्हाला योग्य व्यासपीठ निवडावे लागेल. कारण जर योग्य प्लॅटफार्म निवडला नाही तर तुम्हाला ट्रेडिंग करताना अतिरिक्त फी भरावी लागू शकते. त्याचप्रमाणे, सध्या भारतातील सर्वात लोकप्रिय क्रिप्टोकरन्सी प्लॅटफार्म "Wazirx" आहे.

**Crypto Currency चे फायदे.**

आपल्याला माहित आहे की कोणत्याही गोष्टीचे फायदे आणि तोटे दोन्ही असतात. म्हणूनच आम्ही प्रथम येथे क्रिप्टो चलनाचे फायदे सांगत आहोत.

१. क्रिप्टो चलन एक डिजिटल चलन आहे ज्यामध्ये फसवणूक होण्याची शक्यता कमी आहे.
२. जेव्हा तुमच्याकडे जास्त पैसे असतात तेंव्हा क्रिप्टो चलनात गुंतवणूक करणे फायदेशीर ठरते कारण त्याच्या किमती खूप लवकर वाढतात. त्यामुळे गुंतवणूकीसाठी हे एक उत्तम उदाहरण आहे.
३. बहुतेक क्रिप्टो करन्सी वॉलेट उपलब्ध आहेत, त्यामुळे ऑनलाईन शॉपिंग, पैशांचे व्यवहार सोपे झाले आहेत.
४. कोणतेही प्राधिकरण क्रिप्टो चलनांवर नियंत्रण ठेवत नाही, ज्यामुळे नोटाबंदी आणि चलन अवमूल्यन यासारखा कोणताही धोका नाही.
५. अनेक देश आहेत जिथे भांडवल नियंत्रण नाही. म्हणजे देशाबाहेर किती पैसा पाठवता येईल आणि किती मागवता येईल हे निश्चित नाही. त्यामुळे क्रिप्टो करन्सी सहज खरेदी करून देशाबाहेर पाठवता येते आणि नंतर त्याचे पैशात रूपांतर करता येते.
६. क्रिप्टो चलनाचा सर्वात मोठा फायदा अशा लोकांसाठी आहे ज्यांना त्यांचे पैसे लपवायचे आहेत. म्हणूनच क्रिप्टो चलन हे पैसे लपवण्या-साठी सर्वोत्तम व्यासपीठ म्हणून उदयास आले.

७. क्रिप्टो चलन पूर्णपणे सुरक्षित आहे. त्यासाठी तुमच्याकडे फक्त प्रामाणिककरण असणे आवश्यक आहे, कारण असे चलन ब्लॉकचेनवर आधारित आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे व्यवहार करण्यासाठी संपूर्ण ब्लॉकचेनचे खनन करावे लागेल.

## Crypto Currency चे तोटे

१. क्रिप्टोकरन्सीचा सर्वात मोठा तोटा म्हणजे त्याचे कोणतेही भौतिक अस्तित्व नाही, कारण ते छापले जाऊ शकत नाही. म्हणजे या चलनाच्या नोटा छापल्या जाऊ शकत नाहीत किंवा कोणतेही बँक खाते किंवा पासबुक जारी करता येत नाही.

२. क्रिप्टो करन्सी वरती नियंत्रण ठेवण्यासाठी कोणताही देश, सरकार किंवा संस्था नाही, ज्यामुळे कधी कधी त्याच्या किंमतीत मोठी उडी होते तर कधी खूप घसरण होते, त्यामुळे क्रिप्टो करन्सीमध्ये गुंवणूक करणे धोकादायक ठरते.

३. क्रिप्टो करन्सीचा हे शस्त्रास्त्र व्यापार, अंमली पदार्थाचा पुरवठा, काळाबाजार इत्यादी चुकीच्या कारणांसाठी सहजपणे वापरला जाऊ शकतो, कारण तो फक्त दोन लोकांमध्ये वापरला जातो. त्यामुळे, ते खूप धोकादायक देखील असू शकते.

४. क्रिप्टो करन्सी हॅक होण्याचा धोकाही असतो. ही वस्तुस्थिती आहे की ब्लॉकचेन हॅक करणे तितके सोपे नाही कारण त्यात संपूर्ण सुरक्षा व्यवस्था आहे. असे असतानाही या चलनाचा कोणीहीा मालक नसल्याने हॅकिंगची शक्यता नाकारता येत नाही.

५. क्रिप्टो करन्सीचा आणखी एक तोटा म्हणजे जर तुमच्याकडून एखादा व्यवहार चुकून झाला असेल, तर तुम्ही ती परत घेऊ शकत नाही, त्यामुळे तुमचे नुकसान होते.

❖❖❖

# विचार पुष्प

१) तुटलेली फुले सुगंध देऊन जातात,
गेलेले क्षण आठवण देऊन जातात.
प्रत्येकाचे अंदाज वेगळे आहेत,
म्हणून काहीजण क्षणभर
तर, काहीजण आयुष्यभर आठवतात

२) किती बरं झालं असतं
भविष्य प्रत्येकाला ठरवता आलं असतं
कोण आहे, जगात आपलं
बसून प्रेम करता आलं असतं

३) मनामध्ये असू द्यावा
एक आठवणींचा कप्पा
म्हणजे हवं तेव्हा मारता येतात
दूर गेलेल्यांशी गप्पा

४) तुझ्या स्वप्नांना कधी सांगू नकोस की,
तुला किती अडचणी आहेत,
पण तुझ्या अडचणींना हे नक्की सांग की,
तुझी स्वप्ने किती मोठी आहेत.

५) आकाशात झेपावणारं पाखरू
जसं सांजवेळी घरट्यात परततं
तसं भिरभिरणारं मन माझं
आई तुझ्याच आठवणीत विसावतं

– कु. वैष्णवी भिंगारदेवे
बी.कॉम.भाग १





# धिंग एक्स्प्रेस - हिमा दास

– विश्वजित कटरे
बी.ए.भाग १

'हिमा दास' धिंग एक्स्प्रेस या टोपण नावाने ओळखल्या जाणाऱ्या या धावपट्टू खेळाडूचा जन्म आसाम राज्यातील धिंग जवळील क्यन्थुलिमारी या धोट्याशा गावात ९ जानेवारी २००० रोजी झाला.

घरची परिस्थिती खूपच हालाखिची,तिचे वडील रणजित व आई जोनाली हे भातशेती करतात. तिला तीन भावंडं ही सर्वात लहान ४ नंबरची. तिचा आवडता खेळ फुटबॉल. ती धिंग पब्लिक स्कूलमध्ये मुलांच्या सोबत फुटबॉल खेळायची. तिला फुटबॉलमध्ये कारकिर्द घडवायची होती. फुटबॉल खेळतानाचे तिच्या धावण्याचा वेग पाहून तिच्या शारिरीक शिक्षक श्यामशुल हक यांनी तिला खेळ बदलायला प्रवृत्त केले आणि हाच तिच्या जीवनाच्या टर्निंग पॉईंट ठरला. प्रशिक्षकांच्या सांगण्यावरून तिने धावपट्टू म्हणून प्रशिक्षण घेण्यास सुरूवात केली. हिमा ही प्रथमता कमी व मध्यम अंतराच्या शर्यतीमध्ये भाग घेवू लागली. तिची प्रगती बघून हक यांनी तिचा नागाव स्पोटस् असोसिएशनच्या गौरीशंकर रॉय यांच्याशी परिचय करून दिला. नंतर ती अंतर जिल्हा स्पर्धेसाठी पात्र ठरली व तिने या स्पर्धेत दोन सुवर्णपदके जिंकली. घरची परिस्थिती हालाखिची असतानाही तिच्या घरच्यांनी तिला खूप प्रोत्साहन दिले त्यातच प्रशिक्षण हक यांचे तिला चांगले मार्गदर्शन लाभले. पुढील सर्व खर्च हा प्रशिक्षक हक आणि नागाव स्पोटस् असोसिएशन यांनी घालत तिला तिचा योग्य मार्ग दाखवला. शालेय जीवनामध्ये हिमाने एक धावपट्टू म्हणून खूप चांगल्या कामगिरी हस्तगत केल्या. कमी वयामध्ये जास्त श्रम घेवून उंच भरारी मारण्याचे कार्य हिमाने केले.

दिवसेन दिवस तिची कामगिरी वाढतच गेली. एका छोट्याशा गावात राहणारी गरीब मुलगी, जी एक दिवस आपल्या देशाचे नेतृत्व करेल, अशी बऱ्याच जणांची आशा होती. ती मुलगी सर्वांना माहित झाली ती तिच्या कर्तृत्वामुळेच. जकार्ता इंडोनेशिया येथे २०१८ साली पार पडलेल्या अशियाई ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये आपली ओळख पूर्ण जगाला करून दिली. ४०० मीटर धावणे–रौप्य महिला, ४ x ४०० रिले–रौप्य, ४ x ४०० मिश्र रिले सुवर्ण अशी कामगिरी करत. आपली ओळख जगाला दाखवून दिली. तसेच याच वर्षी IAAF जागतिक २० वर्षाखालील अजिंक्यपद स्पर्धा यामध्ये हिमाने ५१.४६ संकेदाची वेळ घेत ४०० मीटर धावत सुवर्ण पदक पटकावले.

एकवेळ अशी होती की धावताना पायात बुट मिळाला नाही. पण आज जगातील सर्वात श्रेष्ठ बुटाचा ब्रँड असलेल्या अदिदास (Adidas) या कंपनीने आपल्या कंपनी मधील बुटावरती Adidas ऐवजी Himadam असे नाव देत तिला अम्बेसिटर केले. ४०० मीटर धावताना तिने ५०.७९ सेकंदाचा वेळ घेत तिने सध्याच्या भारतीय राष्ट्रीय विक्रम केला. IAAF वर्ल्ड UZO चॅम्पियनशिप मध्ये ट्रॅक इव्हेंटमध्ये सुवर्ण पदक जिंकणारी ती पहिली भारतीय ॲथलीटस् ठरली. तिच्या या कामगिरीबद्दल आसाम सरकारने हिमाला आसाम पोलिसामध्ये पोलिस उपअधिक्षक (डी.एस.पी.) म्हणून नियुक्ती केली.

२०१९ मधील कामगिरी,

**२ जुलै** – पोलंद येथे २०० मी. धावणे – सुवर्ण

**७ जुलै** – पोलंद येथे २०० मी. धावणे – सुवर्ण

**१३ जुलै**–कलादनो स्पर्धा–२०० मी.धावणे – सुवर्ण

**१७ जुलै** – टाबोर स्पर्धा – २०० मी.धावणे – सुवर्ण

**२० जुलै** – नोब मेस्टो – ४०० मी.धावणे – सुवर्ण

या तिच्या कष्टाचे व कामगिरीचा विचार करून भारत सरकारने तिला २०१८ मध्ये 'अर्जुन पुरस्कार' प्रदान केला. आज हिमा दास ही आपल्या खेळासोबतच आसाम पोलिस मध्ये डी.एस.पी. म्हणून कार्यरत आहे. या तिच्या जिद्दीला व कष्टाला सलाम.

❖❖❖

# नाहीसे होत चाललेले ग्रामीण शब्द

- वाहारी – सुन
- बघुनं – पातेल
- फुई – आत्या
- बयतन – जळणाचा लाकूड फाटा
- कुंचा – झाडू
- बेरट – लोणचं
- चाटू – मोठी लाकडी
- वावर – शेत
- काल दी – कालच्या दिवशी
- वावक्य झावर – गोधडी
- टोंगा – गुडघा
- पन्हेर – दारु
- दराबा – मैदा (जाडसर)
- पान – साप
- गंगा फळ – डांगर किंवा काशी फळ
- चेटला – पेटला
- जाम – पैरू
- पावशी – विळा
- चावर ह – खुप बोलणारा
- लघन – लसूण
- जपली – झोपली
- आयशी ठीक्कर – खूप आळशी माणूस
- गरहान – गाऱ्हाणं
- ढोसत..पी.. – पाणी किंवा दूध वगैरे
- गीवल – गिळ
- चंपा – चमचा
- होवडा – चेहरा C
- कुढी – कुठे
- आढी–ताढी – इथे तिथे
- चमन – टकला
- दाब – दाखव
- हुमणी – वाळवी
- साळोता – केरसुनी
- चकुल्या – वरणफळ
- अधिकवार – रविवार
- पाटलुन – पँन्ट
- भुलर – आत
- कवटा – अंडी
- भायर – बाहेर
- हाथरुन – अंथरुण
- चांडो पोरं – लबाड मुलगा
- मोळा – खिळा
- डांब – विजेचा खांब
- मार्तुल – स्क्रू ड्रायव्हर
- कानसुलातं – कानफाडात
- गुच्ची – बुक्की
- वायच – भोड
- धवला – सापडला
- गायवळ्या – मंद
- राखुंडी – राख

– शुभम कुंभार
बी.ए.भाग १



"क्या हार में, क्या जीत में
किंचित नहीं भयभीत मै
कर्तव्यपथपर जो भी मिला
यह भी सही, वह भी सही
वरदान नहीं माँगूंगा
हो कुछ भी पर हार नहीं मानूंगा !"

**- अटल बिहारी वाजपेयी**

# हिंदी विभाग

**प्रा. सुरज व्ही. डुरे-पाटील**
**विभागीय संपादक**

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १. स्त्री पुरुष समानता | – कु. उषा जाधव | बी.ए.भाग २ | ३७ |
| २. वैश्विक तापमान : एक समस्या | – कु. मेघना भंडारे | बी.ए.भाग २ | ३९ |
| ३. उपाययोजना | – कु. सुषमा करकटे | बी.ए.भाग १ | ४० |
| ४. बैल गाडी बंदी | – शुभम कुंभार | बी.ए.भाग १ | ४१ |
| ५. आजादी का अमृत महोत्सव | – प्रदीप पाटील | बी.ए.भाग ३ | ४२ |


## पद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १. हमारा महाविद्यालय | – कु. मेघना भंडारे | बी.ए.भाग ३ | ३८ |
| २. जिंदगी | – अमोल कुंभार | बी.ए.भाग ३ | ३८ |
| ३. कैसे भुलाएँ | – कु. उषा जाधव | बी.ए.भाग २ | ४१ |
| ४. माँ–बाप | – शुभम कुंभार | बी.ए.भाग १ | ४४ |
| ५. आखरी साँस तक | – निहाल तांबोळी | बी.ए.भाग ३ | ४४ |
| ६. वादा | – कु. उषा जाधव | बी.ए. भाग २ | ४५ |
| ७. शायरी | – प्रसाद चव्हाण | बी.ए.भाग २ | ४५ |
| ८. बेटियाँ | – साहिल बनसोडे | बी.ए.भाग ३ | ४५ |
| ९. प्यार | – ओंकार शिंदे | बी.ए.भाग २ | ४६ |
| १0. बचपन | – कु. गौरी महापुरे | बी.ए.भाग १ | ४६ |



# स्त्री - पुरुष समानता

- कु.उषा जाधव
बी.ए.भाग २

आज भारत को स्वतंत्रता प्राप्त कर लगभग ६३ साल हो गए । इस २१ वी सदी मे विज्ञान तथा तंत्रज्ञान ने बहुत बड़ी तरस्की प्राप्त की है । भारत ने लोकशाही शासन पध्दति का स्वीकार किया है और उसमें एक महत्त्वपूर्ण मूल्य का भी स्वीकार किया है । जो स्त्री–पुरुष समानता के नाम से जाना जाता है । आज की यह पीढ़ी एक तो पुरुष प्रधान संस्कृति पर जोरो का प्रहार करती है । इनमे स्त्री पुरुषों पर टिकाटिप्पणी कहती है तो दूसरी और पुरुष स्त्रियों को नीचा दिखाकर अपना जोर एवं श्रेष्ठता दर्शत्ति है । यहाँ आप कहेंगे कि वह कैसे सोच सकते है?

ग्रींस के बहुत बड़े तत्वज्ञ सॉक्रिटेस ने कहा है कि, ''ज्ञान से बढ़कर कोई शक्ति नही है ।'' (Knowledge is power) आज की युवा पीढ़ी से मेरा यही कहना है कि, हम ही आपस में यह स्त्री–पुरुषों को भडकाने का कार्य कर रहे है । मुझे इन सभी नारियों पर गर्व हैं, जिन्होने अपने कार्य कर्तव्य एवं प्रतिक्षा के बलपर अपना अलग अस्तित्व निर्माण किया है । आज नारी किसी भी क्षेत्र में पिछे नही हैं फिर चाहे वह विज्ञान, खेल, समाजसेवा, सांस्कृतिक क्षेत्र आदि सभी क्षेत्रों में वह श्रेष्ठ हो गई है । मुझे गर्व है अपनी माँ, बहन तथा समाज में आदर्शवत कार्यरत उन सभी महिलाओं पर । जैसे–मरींजो की सेवा करते पूरी जिंदगी को न्योछावर करनेवाली वह 'मदर टेरेसा', हिंदवी स्वराज्य का निर्माण करने के लिए कमर कसनेंवाली जीजाबाई, हमारी एक सहचारिणी असफल होने के बावजूद स्वयं के प्राणों की बाजी लगानेवाली सुनिता विल्यमस, अन्याय अत्याचार का सामना करके अनाथों को अपना करनेवाली सिंधुताई सपकाळ, भ्रष्टाचार एवं अन्याय से दो हाथ करनेवाली मेघा पाटकर आदी कई उदाहरण हमारे आँखो के सामने आ जाते है । लेकिन हमे यह ज्ञात होना चाहिए कि ईश्वरने स्त्री और पुरुष का निर्माण क्यो किया है? इसके पिछे कोई–न–कोई कारण जरुर है, हमें उन नौजवानों को जानना जरुरी है । इस चकाचौंध भरी दुनियों में सभी एक है, सभी को समानता का हक प्रदान करना चाहिए । हम बचपन से माँ या अन्य कई स्त्रियों को पूजकर या उनका लाड–प्यार पाकर ही बड़े हुए हैं । लेकिन आज के दौर में अगर हम ताक ले तो क्यां यह बात सच दिखाई देती है कि हम यानि की पुरुष स्त्रियों को समानता का दर्जा नही देते । अगर यह सच है तो क्या भारत के सर्वोच्च स्थानपर राष्ट्रपती महिला होती? पंतप्रधान, राज्यपाल, पुलिस आयुक्त, जिल्हा अधिकारी, जिल्हा तहसीलदार, ग्रामसेवक, सरपंच आदि शासकीय जगहों पर आज भी वे विराजमान है । आज ऐसा कोई क्षेत्र नही जहाँ वह अपने कार्य कौशल के साथ कार्यरत नही है ।

भावनिकता के आधारपर अगर देखा आप तो माँ घर का मांगल्य है, तो पिताजी घर का अस्तित्व । किन्तु आज भी हमने उसे क्या जाना–पहचाना है, नहीं बिलकुल नही । क्योंकि उनके बारे में कोई लिखता नही, बोलता नही । कई विद्‌वान संत, महंत, कवि, कथाकार, उपन्यासकार एक माँ की या स्त्री की अनुभूति अपनी आदर्शवत भाषा तथा वाणी एवं

विचारों से करा देता है । कुछ लोगों ने पुरुषों के बारे में लिखा तो वह एक क्रोधित या अन्याय, अत्याचार करनेवाला, परंतु छोड़कर कुछ अच्छे लोग भी है उनका क्या? कोई भी पौराणिक ग्रंथ या कथा देखी जाए तो एक स्त्री का बड़ा करके चित्रण किया जाता है परंतु पुरुष एक खलनायक जैसा कार्य करता दिखाया गया है ।

किंतु अगर स्त्री के पास आँसु की नदियाँ होती है, तो पुरुषों के पास संयम के बाँध होते है । स्त्री होकर अपना मन उसका कर देती है । मगर पुरुष सभी को धीरोदत्त बनाता है । वहाँ पर स्त्री को ज्यादा महत्व मिलता है । पर क्या आपको मालूम है कि व्यवस्था मे आने का प्रयास उन्होंने शिक्षा देकर किया है ।

अखिर में मैं आपको यही कहना चाहूँगी कि स्त्री–पुरुष यह दोनो एक संसार रुपी रथ के दो पहिये हैं और दोनों मजबूत होने चाहिए । इसलिए कोई छोटा था बड़ा नही, तो दोनों बराबर है । इनमे न कोई वास्तविक संघर्ष है, न रहेगा । ❖❖❖

## हमारा महाविद्यालय

ज्ञान मिलता है जहाँ
और अध्ययन भी बढ़ियाँ
महाविद्यालय है एक दुनियाँ मे
हमारे कडेपूर शहर मे ।।१।।

खूबसूरत है वातावरण यहाँ का
खूबसूरत इमारतों से लिपटा
खिली है यहाँ कई पिढ़ीयाँ
तो गर्व से कहने प्यारा
ए.सी.सी. के कॉलेज यहाँ ।।२।।

हम भी आये हैं, और भी आयेंगे
सभी ज्ञान का सागर पियेंगे
जिने की अच्छी मंजिल पायेंगे
ए.सी.सी. के कॉलेज का नाम बढ़ायेंगे ।।३।।

दर्द होता है इसे छोड़ने
खुशी मिलती है जहाँ बढ़ने
जियेगे दुनियाँ में इसे याद करते
क्योंकि हम हैं इसे बहुत प्यार करते ।।४।।

– कु.मेघना भंडारे
बी.ए.भाग ३

## जिंदगी

जिंदगी है एक सफर,
जो ले जाती है कहीं
और कभी इस मोडपर,
तो कभी उस मोडपर ।
जिंदगी है एक राह,
जो मन को देती है चाह ।
कभी प्यार एतबार की चाह
जिंदगी तो डगर है,
जो चलना वही सफर है।
जो रुकता वही मुकरता है,
मुकद्दर जिंदगी को नवरंग है
कभी देता मन को तरंग,
तो कभी आनंद का भंग ।
जिंदगी वही रुकती है,
जहाँ तकदीर
जिंदगी वही साथ छोड़ती है,
जहाँ उठा है मुकद्दर

– अमोल कुंभार
बी.ए.भाग ३






# वैश्विक तापमान : एक समस्या

– कु.मेघना भंडारे
बी.ए.भाग २

ब्रम्हांड में अनेक सूर्यमालाएँ होती है, जिसमें हम अपना जीवन व्यतीत कर रहे हैं । उस सुर्यमालिकाओं में मंगल, शुक्र, शनि, पृथ्वी, चंद्र जैसे अनेक ग्रह है । पूरी दुनियाँ के सामने वैश्विक तापमान या ग्लोबल वॅर्मिंग यह अत्यंत तीव्र समस्या उपस्थित हुई है । दुनिया के प्रमुख शास्त्रज्ञोंने तापमान यानि मुख्यत: जमीन का तापमान, महासागर का तापमान और वातावरण के पहले स्तर का तापमान पिछले २५० वर्षोंमे यह तापमान धीरे–धीरे बढ़ रहा है । लेकिन पिछले १० सालो में यह तापमान इतना तीव्र गति से बढ़ रहा है कि उसका असर पुरे दुनियाँ पर ही रहा है ।

यह तापमान में अपने आप बढ़ाती ही प्राकृतिक नहीं है । इस तापमान की वजह इन्सान या मानवजाति है । औद्योगिकरण, आधुनिक प्रगति, आत्मकेंद्री बाजार. पर्यावरण विनाश के मोह में औद्योगिकरण के कारण इन ६ वायू के प्रमाण में बढोत्तरी हो रही है । जिसे पृथ्वी का तपमान बढ़ रहा है । पिछले साडे छ: लाख वर्ष के बाद प्रथम ही इन वायुओं का प्रमाण दुगणा हुआ है ।

सूर्यप्रकाश, हरितद्रव्य और मनुष्य मे श्वास के द्वारा छोडा हुआ कार्बनडाय ऑक्साईड इन तीनों के बिना हम जिंदा भी नहीं रह सकते दुनियाँ में सभी जगह गाडियाँ का प्रमाण अधिक बढ़ रहा है । उन गाड़ियोंमें का निकलनेवाला कार्बन डायऑक्साइड उससे बढ़नेवाला प्रदूषण रोकने के लिए हमें वृक्षों की जरुरत है । भू–क्षेत्रपर जंगल या वृक्षों का प्रमाण ३३% होना चाहिए, लेकिन वह प्रमाण ३ य ५% ही रह गया है । इलेक्ट्रॉमॅग्नेटिक फोर्स या का प्रमाण उपयोग बढ़ गया है । उससे मनुष्य के अंतर्गत अनेक समस्याएँ हमने यह अपील खुद मोह ली है । इसका परिणाम यह हो रहा है कि दुनियाँ का तपमान बढ़ रहा है । पिछ्ले १०० वर्षों में महासागर कि उँचाई लगभग ८ इंच से बढ़ी हुई है और दुनियाँ का तपमान १ अंश से बढ़ गया है ।

तपमान बढ़ने का प्रमुख कारण है पृथ्वी के आसपास रहनेवाला वातावरण का पहला स्तर (पतांबर) इसमें प्रमुख ६ वायु होते है । यह वायु कार्बन डायऑक्साइड, मिथेन, नायट्रस ऑक्साइड, सल्फर हेक्साब्लोराईड इन सभी वायुको वातावरण में प्रमाण एक प्रतिशत से भी कम होता है, जो पृथ्वी पर आनेवाली सूरज की किरणोंसे गरमी (उष्णता) को पकडकर रखता है । जीवसृष्टी वातावरण अनुकूल रखता है । बिमारियाँ निर्माण हो रही है । जैसे देखा जाए तो ५० साल का एक वृक्ष प्रतिदिन २ टन कार्बन डायऑक्साइड देता जाता है । और ७७५ कि. ग्रॅ. ऑक्सिजन देता है और १० एअर कंडिशन इतनी शीलता निर्माण करता है ।

*** तपमान बढ़नेसे दर्पभाष्य खतरें :**

१. इ.स. २०३० में २ से लेकर २.८ तक तपमान बढ़ सकता है । वैज्ञानिकों का यह अंदाज भी है कि इ.स. २१०० तक ५ से ७ तपमान बढ़ सकता है ।

२. दुनियाँमें हिमालय जैसे बर्फ के पर्वत भी पिघलकर नष्ट हो जाऐंगे । उससे उत्तर भारत के ७०% लोग पानी से वंचीत रह जाएंगे ।

३. महासागर कि ऊँचाई हर १0 सा से । फूट बढ़ जाएगी । जिससे बांग्लादेश, मालदीव, त्रिनिदाद, इंडोनेशिया आदिने अनेक देश जलसमाधि में विलिन हो जाएंगे ।

४. भारत के समुद्र तट के क्षेत्रके नजदिकी कोलकात्ता, गोवा, मुंबई, विशाखापट्टणम, कांडला आदि. अनेक शहर भी पानी में डूब जाएँगे ।

५. मीठे जल या पीने के जल का बाष्पीभवन होनेसे भूजल के पानी का स्तर अत्यंत नीचे चला जाऐगा जिससे खेती और पीने की पानी की समस्या उपस्थित हो जाएगी ।

६. अकाल के कारण राष्ट्रीय अनाज कि समस्या उत्पन्न हो जाएगी ।

७. उष्ण मौसम कि बजहसे सेब, चेरी, लिच्यी, बासमती चावल, गोबी, फ्लॉवर आदि जैसी फल-सब्जियाँ, अनाज भारत से खत्म हो जाएंगे ।

८. तपमान बढ़ने से डेंग्यु, मलेरिया, कॉलरा, चिकन गुनियाँ आदि बिमारियों का फैलाव हो जाएगा, जिससे जनजीवन पर भारी संकट आएगा ।

९. पशु, पंछी, पेड़ पौधे, किटक, तितलियाँ इन २५% जातियाँ खत्म हो जाएगी ।

१0. हमारें देशमें सभी लोगोंने 'एक मनुष्य-एक वृक्ष' इस संकल्प के साथ-साथ अलग-अलग जाति के वृक्ष लगाने चाहिए ।

११. अलग-अलग उपक्रमों के द्वारा समाज का प्रबोधन करना चाहिए । जिससे १ साल प्रबोधन चाहिए ।

१२. इस विषय का सामान्य जनता की वैज्ञानिक मार्गदर्शन करना चाहिए ।

❖❖❖

## उपाययोजना

१. कोयला और तेलपर आधारित जो बिजली निर्माण हो रही है, उसे हमें कम करना होगा । सौर और पवन ऊर्जा का ज्यादा से ज्यादा उपयोग करना चाहिए ।

२. इंधन कि बचत करनी होगी । सार्वजनिक गाडियों का उपयोग ज्यादा से ज्यादा करना चाहिए ।

३. साधारण ब्लब या दूब के अलावा 'सी.एफ.एल.' लाईट या सौर क्लबका उपयोग करना चाहिए ।

४. फ्रिज और एअर कंडिशनर का उपयोग आवश्यकता होनेपर ही करना चाहिए । घरमे सौर उपकरण लगाना चाहिए ।

५. खेती की पद्धती प्राकृतिक और किटकनाशकों और सेंद्रिय खेती करने के लिए लोगों को बढ़ावा देना चाहिए ।

६. आसपास के पेड़ पौधों का रक्षण करना चाहिए । वृक्षोंको काटने से हमे उन्हें बचाना चाहिए ।

७. पानी के स्त्रोतों को पुनरुज्जीवित करना चाहिए । जल कि हानी नहीं करनी चाहिए।

८. उपयोग न होनेपर टी.व्ही., कॉम्प्युटर, फ्रीज आदिका मुख्य बटन बंद करना चाहिए ।

– कु.सुषमा करकटे
बी.ए.भाग १




# बैल गाडी बंदी

– शुभम कुंभार
बी.ए.भाग १

बैलगाडी दौड़ को महाराष्ट्र के पारंपरिक खेल के रूप में जाना जाता है । बुण्यफाइटिंग प्रतिबंध और लगातार सुखा इसे डेयरी मवेशियों की खिल्लर नस्ल विलुप्त गई है जिसे राज्य के सबसे खूबसूरत और शानदार घरेलू जानवरों में से एक माना जाता है । पचीस से पच्चीस साल पहले ग्रामीण इलाकों में हर किसान के घर दरवाजे पर एक खिल्लर गाय थी । इसी कारण से । खिल्लर को गाय के दूध से एक प्रकार की उर्जा प्राप्त होती थी ।

बैलगाड़ी दौड़ और महाराष्ट्र सांड और किसान का रिश्ता काफी समय से चला आ रहा है । अदालत ने बैलगाडियों दोड़ और महाराष्ट्र, सांड इस आधार पर प्रतिबंध लगा दिया कि बैलगाडियाँ बेलो के लिए उपद्रव है, और यह कि बैल, जो पहले से ही खेत में ट्रॅक्टरों के आगमन से निर्वासित हो चुके थे । किसानों के लिए एकमात्र बैलगाड़ी दौड थी । लेकिन रेस बैल के बाद सांडो को भीबिंक गया। और बैलों की जोडी जो किसान के खलिहान पर दिखाई दे रहीं थी वह केवल तस्वीर में देखी जा सकती थी।

सुप्रीम कोर्ट ने महाराष्ट्र में बैलगाडी दौड़ फिर से शुरू करने की अनुमति दे दी है । इसलिए चार साल बाद नियम व शर्तो के साथ बैलगाडी दौड़ को फिर से आयोजित करने का मार्ग प्रशस्त हुआ है। अदालत में यह भी कहा कि कर्नाटक और तमिलनाडु में पशु क्रूरता विरोधी कानूनों के आधार पर महाराष्ट्र में बैलगाडी दौड़ शुरू की जा सकती है ।

सुप्रीम कोर्ट में आज सुबई (१६ दिसंबर) याचिका पर सुनवाई हुई । इसमें बैलगाड़ी दौड़ को फिर से शुरू किया जा सकता है, कोर्ट ने पैसला सुनाया है । आपके सभीके न्यायने बैलगाडी शर्यत बंदी उठ गई ।

❖❖❖

---

# कैसे भुलाएँ

कैसे भुलाएँ उन पलों को
जो गिरकर उठाना सिखाते है ।
कैसे भुलाएँ उन पलों को
जो हर मुश्किल में
सामना कराना सिखाते है ।
कैसे भुलाएँ उन पलों को
जो दुःख में भी हँसना सिखाते है
कैसे भुलाएँ उन पलों को
जो मरकर भी जीना सिखाते है।
कैसे भुलाएँ उन पलों को
जो दूसरों को मदद करना सिखाते है।
कैसे भुलाएँ उन पलों को
जो मरते दम तक जीना सिखाते है।
कैसे भुलाएँ उन पलों को
जो थोडासा पाना और
बहुत कुछ खोना सिखाते है ।

– कु.उषा बी. जाधव
बी.ए.भाग २

७५ भारत अमृत महोत्सव
हर राह पर बढ़ते कदम

# आजादी का अमृत महोत्सव

– प्रदीप पाटील
बी.ए.भाग ३

एक महाअभियान के रूप में आजादी के ७५ साल पूरे होने पर साबरमती आश्रम से अमृत महोत्सव की शुरुआत १२ मार्च २०२१ से हुई । जिसके तहत पहला अमृत महोत्सव १५ अगस्त २२२१ को मनाया गया है । प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने १२ मार्च २०२१ को अहमदाबाद के साबरमती आश्रम से 'आजादी का अमृत महोत्सव'का उद्घाटन किया था । यह १५ अगस्त, २०२२ को देश की आजादी की ७५ वीं वर्षगाँठ से ७५ सप्ताह पहले शुरू किया गया था. यह एक ऐसा महाउत्सव है जिसका अर्थ की स्वतंत्रता की ऊर्जा का अमृत है । मतलब कि क्रांतिकारियों, स्वतंत्रता सेनानियों, देशभक्तों की स्वाधीनता का ऐसा अमृत है, जो कि हमे सदैव देश के प्रति समर्पित रहने की प्रेरणा देता है । हमारे मन में नए विचारों,नए संकल्पों की क्रांति लाता है । 'आजादी का अमृत महोत्सव' यानी स्वतंत्रता सैनिकों की स्वाधीनता का सार । 'आजादी का अमृत महोत्सव' मतलब नए आयोजित आठवें राष्ट्रीय फोरम को सम्बोधित करते हुए मोहनजी जी ने कहा कि 'आजादी का अमृत महोत्सव' अभियान वर्तमान में सरकारी विभागों द्वारा चलाया जा रहा है और इससे निजी क्षेत्र को भी जुड़ना चाहिए ।

इन्सान अपने सभी बंधनों से आजाद, मन के कुसंस्कारों के बन्धन से आजाद हों तो उसे पूरी आजादी मिलेगी । दूसरों से लड़कर उनके बन्धन से तो आजाद हो गये, स्वयं के अन्दर व्याप्त कुसंस्कारों से लड़कर कितने लोग आजाद हो पाते हैं यह तो वक्त ही जानता है । आजादी एक दिन में नहीं मिली, शताब्दियाँ लग गयीं, इन बातों को भी समझने में वक्त लगेगा । भारत सरकार ने स्वतंत्रता की ७५ वीं वर्षगाँठ मनाने के लिए आजादी का अमृत महोत्सव अभियान के तहत अब तक लगभग सात हजार कार्यक्रम आयोजित किये हैं । संस्कृति सचिव गोविन्द मोहन ने शुक्रवार को यह जानकारी दी ।'आजादी का अमृत महोत्सव' अभियान की शुरुआत १ मार्च २२ को हुई थी । 'पब्लिक अफेयर्स फोरम ऑफ इंडिया' (पीएएफआई) के डिजिटल माध्यम से आयोजित राष्ट्रीय फोरम को सम्बोधित करते हुए मोहन ने कहा कि ''आजादी का अमृत महोत्सव'' अभियान वर्तमान में सरकारी विभागों द्वारा चलाया जा रहा है और इससे निजी क्षेत्र को भी चाहिए ।

उन्होंने कहा, ''आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रम के तहत हम एक सहयोगात्मक तालमेल बनाने का प्रयास कर रहे हैं । सहयोगात्मक तालमेल का सार यह है कि हम विभिन्न मंत्रालयों, विभागों और सरकारों के सामान्य कामकाज में बदलाव लाना चाहते हैं और अकेले का करने की संस्कृति को हटाकर साथ मिलकर काम करने का प्रयास कर रहे है ।''

उन्होंने कहा,''अब तक, हमने भारत भर में विभिन्न सरकारी विभागों और विदेशों में हमारे मिशनों के जरिये ७००० कार्यक्रम आयोजित किए हैं । मोहन ने कहा कि सहयोगात्मक रवैये के कारण ही आर्थिक प्रगति को बल मिलेगा और इसका गुणात्मक असर होगा।

उन्होंने कहा, ''इस अभियान में बड़े स्तर पर निजी क्षेत्र की भागीदारी होनी बाकी है । हम चैबर्स को एक साथ लाकर चर्चा कर अगले तीन महीने का कार्यक्रम साँझा करना चाहते हैं ।'' उन्होंने कहा कि २०० से ज्यादा देशों में भारतीय मूल के विदेशी लोगों को साथ लाया जाएगा और नेताजी सुभाषचंद्र बोस नीत आजाद हिन्द फौज जैसे सैनिकों और अनाम नायकों से लोगों को अवगत कराया जाएगा ।

अपने संदेश में मोदी ने कहा, राष्ट्र आजादी का अमृत महोत्सव मना रहा है, और एक वैभवशाली भारत बनाने का हमारा सपना १३० करोड़ भारतीयों का सामूहिक संकल्प है । पीएएफआई जैसे हितधारकों की भूमिका ऐसी स्थिति में और बढ़ जाती है,जिससे नए भारत में अवसरों का लाभ उठाना आसान हो जाता है । अमृत है जो कि हमे सदैव देश के प्रति समर्पित रहने की प्रेरणा देता है । हमारे मन में नए विचारों,नए संकल्पो की क्रांति लाता है। आजादी का महोत्सव का उद्देश्य देशभर में एक अभियान चलाकर देशभक्ति भावनाओं का प्रसार करना है । गुमनाम शहीदों की गाथाएँ जन जन तक पहुँचाता है प्रत्येक विभाग अपने कार्यक्रमों की रूपरेखा तैयार करके कार्यक्रम का आयोजन करेगा । जिसमें में अब तक की उपलब्धियों का प्रसार प्रचार करेगा । आजादी का महोत्सव का उद्देश्य भारत का देशभक्ति रंगों से रंगना है इस अभियान के तहत स्कूलों में, कार्यलयों में कार्यक्रम जैसे खेल, गीत, सांस्कृतिक कार्यक्रम, पोस्टर, बैनर के माध्यम देशभक्ति भावनाओं का प्रचारित करना है ।

आजादी का अमृत महोत्सव का अंतिम कार्यक्रम १५ अगस्त २०२३ को मनाया जाएगा । चूकी प्रधानमंत्री नरेंन्द्र मोदी का कहना है कि यह कार्यक्रम हर २५ साल के अंतराल में समाया जाएगा । आजादी की कहानी करीब से नहीं जान पाए क्योंकि आमतौर पर पुस्तकों में पढ़ने को मिलती है । उसे गहराई से जानने के लिए, देर से मिली आजादी को महसूस करने के लिए इस प्रकार से 'आझादी का अमृत महोत्सव' का आयोजन बहुत आवश्यक है । ताकि युवा पीढ़ी के दिलो दिमाग पर देशप्रेम की भावनाओं का संचार हो । अपने देश की स्थिति एवं तरक्की के बारे में अच्छे से जान सकते है। इनके लिए सांस्कृतिक कार्यक्रम सबसे अहम भूमिका निभाते हैं । यही कारण है कि इस अभियान में कार्यक्रमों की लंबी चौड़ी सूची है । आजादी का महोत्सव कोई नया नहीं है । इनकी शुरुआत सन १५ में क्रांति के रूप में हो चुकी थी । यह भारत का पहला स्वतंत्रता संग्राम था जो देश की आजादी के लिए लड़ा गया था । भारत के स्वतंत्रता सेनानियों ने अंग्रेजी को उखाड़ फेंकने के लिए किया प्रथम प्रयास था । इस बात प्र निम्न पंक्तीयाँ याद आ रही है।

रह जाए रक्त की बेला
जरा-सी अमृत उठा लेना ।
आजादी अब परवान चढ़ेगी
भाग्य से आंख मिला लेना।
बिकट संकट राह में कटक
तपिश से जुझना सीख जाना ।
देश का हाथ थाम कर तुम अब
माँ भारती का शीश गगन लहरा जाना ।
आजादी के इस अमृत महोत्सव पर.
आओ मिलकर करे हमसब संकल्प अब ।
नव-भारत के निर्माण को करना होगा
''देश-मंथन''
अमृत को खोज कर करना होगा आविष्कार अब।

❖❖❖

# माँ-बाप

जिन्होंने सदा हमें अपना माना
हमारी गलतियों को सदा माफ करना जाना
जिनके कदमों में हैं सारा जमाना
माँ-बाप हैं वह अनमोल खजाना।
क्या सही क्या गलत उन्होंने जाना
हमारी मुस्कुराहट के लिए
छोड़ा खुद मुस्कुराना
जिनसे है है यह सारा जमाना
माँ-बाप हैं वह अनमोल खजाना।
रात-रात जागकर सोचा हमें सुलाना
पी- गए अपने आँसू और अपने गमों का पैमाना
हम सदा खुश रहे यह उन्होंने जाना
माँ- बाप है वह अनमोल खजाना।
उसके मुसिबतों का सामना
सदा सोचा हमें बचाना
जिन्होंने सिखाया जिंदगी की राह पर चलना
है यह मानता जमाना
मॉ-बाप है यह अनमोल खजाना।
जिंदगी में कभी उन्हें ना भुलाना
जिंदगी वही तो उनके कदमों में बिताना
सदा उन्हें देना खुशियो का नजराना
क्योंकि माँ -बाप है एक अनमोल खजाना।

- शुभम कुंभार
बी.ए.भाग १





# आखरी साँस तक...

हर फूल मुबारक हो आपको
हर बहार मुबारक हो आपको
शायद कल हम रहे या न रहे
हर नया साल मुबारक हो आपको।
सब कहते है अच्छे लोग भर कर
सितारे बन जाते हैं।
मगर हम कहते हैं
अच्छे सितारे टुटकर
आप जैसे दोस्त बन जाते हैं।
जिंदगी में हर किसी
का कोई दोस्त होता है।
मगर आप जैसा दोस्त मिले
वह खुशनसीब होता है।
क्या बताया आपको हम
कितने बुशनसीब हैं।
क्योंकि आप जैसा दोस्त
हमारे दिल के करीब है।
कहो उसी से जो ना कह किसी से
माँगा उसी से जो दे दे खुशी से
चाहो उसे जो तुम्हें मिले किस्मत से,
दोस्ती करो उसी से जो हमेशा निधारा हंसी से
चाँद की रोशनी से दिन तक
सूरज की दोस्ती दिन से रात तक
पर हमारी दोस्ती आखरी साँस तक।

- निहाल तांबोळी
बी.ए.भाग ३

## वादा



जिंदगी के सफर में,
दिया है तूने सहारा।
दिल तो हमारा है,
लेकिन उसमें अशियाना है तुम्हारा ।।
जिंदगी के सफर में,
किया है तूने जो इशारा।
चलने लगा है जीवन हमारा,
इसमें लकदीर का है सहारा ।।
जिंदगी के सफर में,
किया है जो वादा।
है तेरा मजबूत इशारा,
लेकिन दुश्मन है जमाना ।।
जिंदगी के सफर में,
किया है जो वादा।
किया है मैने भी इरादा।
अटल है मेरा वादा,
प्यार हमारा अमर रहेगा सदा ।।

– कु.उषा जाधव
बी.ए.भाग २

## शायरी

मत मांगना मेरी लम्बी उम्र की दुआ ख़ुदा से,
बस मेरी जिन्दगी का सफर तब तक का लिख
जब तक हम साथ है।

आँखों की चमक पलकों कि ज्ञान हो तुम,
चेहरे की हसी लबों कि मुस्कान हो तुम,
धड़कता है दिल बस तुम्हारे इन्तहा मे,
फिर कैसे जा कहूँ, मेरी जान ही तुम।

मेरे दिल की नाजुक धड़कनों को,
तुमने धड़कना सिखा दिया,
जबसे मिला है प्यार तेरा,
गम में भी मुस्कराना सिखा दिया।

तेरे खामोश होठों पर मोहब्बत गुनगुनाती है,
तू मेरी हैं,
मैं तेरा हुँ,
बस यही आवाज आती है।

– प्रसाद चव्हाण
बी.ए.भाग २

## बेटियाँ

बेटी बनकर आयी हूँ माँ-बाप के जीवन में
बसेरा होगा कल मेरा किसी और के आंगन में,
क्या यह रात खुदा ने बनाई होगी
कहते हैं. आज नहीं तो कल तू परायी होगी
देकर जनम पाल-पोसकर जिसने हमें बड़ा किया
और वक्त आया तो उन्हीं हाथों ने हमें विदा किया
टूटकर बिखर जाती है हमारी जिंदगी वहीं
पर फिर भी उस बंधन में प्यार मिले जी तो नहीं
क्यों रिश्ता हमारा इतना अजीब होता है ?
क्या बस यही हम बेटियों का नसीब होता है?



– साहिल बनसोडे
बी.ए.भाग ३

## प्यार

प्यार एक रेशम की डोर है
जो कभी टूटती नहीं ।
प्यार एक कली है
जो कभी मुरझाती नहीं ।
प्यार वो रिश्ता है
जो दिलों को जोड़ता है ।
जो माँ के दिल को अपने
बच्चों के लिए पिघलता है ।
प्यार एक राखी है,
जो भाई-बहन को एक धागे में बांधती है ।
प्यार एक कौदी जंग है
जो देश के सैनिकों को
अपने देश के लिए अपनी
कुर्बानी देने के लिए तैयार करती है ।

– ओंकार शिंदे
बी.ए.भाग २





## बचपन

एक बचपन का जमाना था,
जिसमे खुशियों का खजाना था,
